। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ५८ वा । बुधवार दिनांक ०६ मे, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### दोन्ही हाताचे मनगटास घट्ट पकडून केला लैंगिक अत्याचार

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत २७ वर्षीय महिला दि.०१.०२.२०२६ रोजी हि घरी असताना एका गावातील एका तरुणानी तिस दोन्ही हाताचे मनगटास घट्ट पकडून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.०२.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(१) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी स्वप्नील लक्ष्मण विश्वासे, वय ३१ वर्षे, रा. रुई ढोकी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ४७,००० किंमतीची मोटरसायकल घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-स्वप्नील विश्वासे यांनी दि.०१.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### शस्त्र कायद्यांतर्गतगुन्हा नोंद

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत युवराज रा. खानापुर ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.०४.०५.२०२६ रोजी गगनगीरी पेट्रोलपंपाजवळ पिंपरखेड शिवारात लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक लोखंडी कोयता हा विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला परंडा पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-गजानन मुळे, सपोउपनि नेमणुक पोलीस ठाणे परंडा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं. कलम ३५२ सह शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### दोन लाखाची चोरी

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि. ३१.०३.२०२६ रोजी सकाळी बी. यु भंडारी एनर्जी प्रायव्हेट लि. शाखा खामसवाडी येथील अज्ञात व्यक्तीने ०४ स्केवअर एम.एम. स्टींग डिसी केबल कॉपर तांब असलेले २००० मिटर चे ०३ ड्रम तोडून अंदाजे २,००,००० चे नुकसान करुन ४,५०० किंमतीचे साहित्य डिसी. केबल चोरुन नेलेअशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सागर भिमराव चोपाटे, वय ४० वर्षे, सुपरवायझर रा. सुर्डी बेगडा ता. जि. धाराशिव यांनी दि.०४.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शिराढोणै पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३२४(५), ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ‘तडजोड शुल्क’वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्वाच्या रस्त्यांवर दि.०४ में एप्रिल रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २६५ कारवाया करुन २,१७,४५० ‘तडजोड शुल्क’वसुल केले आहे.

## कळंब पवन ऊर्जा प्रकल्प ठरेल विकासाचा नवा टप्पा : जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार

धाराशिव,दि.४ मे (जिमाका)कळंब पवन ऊर्जा प्रकल्प टप्पा-१ हा जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार असून, नवीकरणीय ऊर्जेच्या माध्यमातून जिल्ह्यात शाश्वत विकासाला चालना मिळेल. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात सेरेंटिका कंपनीच्या ३० मेगावॅट क्षमतेच्या कळंब पवन ऊर्जा प्रकल्प टप्पा-१ चे उद्घाटन उत्साहात पार पडले.उद्घाटन सोहळ्यास जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक रितू खोखर, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव के.पी.बक्षी,सेरेंटिका रिन्यूएबल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षय हिराचंदानी,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,कळंब उपविभागीय अधिकारी श्री.शिंदे,धाराशिवचे उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,सेरेंटिकाचे निनाद पितळे तसेच श्रीमती अन्नपूर्णा जे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्ह्याच्या औद्योगिक व पर्यावरणपूरक विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार असे सांगून श्री.पुजार म्हणाले की,जिल्ह्यात विविध कंपन्यांचे नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू असून,कळंब प्रकल्पासाठी शेतकरी व कंपनी यांच्यात सातत्याने संवाद साधण्यात आला.



सेरेंटिका कंपनीला राज्यात १२०० मेगावॅट क्षमतेची मंजुरी मिळाली असून,धाराशिव जिल्ह्यात सुमारे १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.नवीकरणीय ऊर्जेच्या प्रकल्पांबाबत शेतकऱ्यांकडून यापूर्वी मोर्चे,निवेदने व उपोषणे होत होती.या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी स्तरावर नियमित बैठका घेऊन बाधित शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतल्याचे श्री.पुजार यांनी सांगितले.

ज्या गावांमध्ये कंपनी काम करते त्या ठिकाणी शेतकरी व ग्रामस्थांशी चांगला समन्वय साधण्यात आला आहे.कंपनीने सामाजिक उत्तरदायित्व निधीतून गावातील नागरिक व विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवले असून,इतर कंपन्यांनीही हा आदर्श घ्यावा,असे श्री.पुजार यांनी नमूद केले. स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कंपनी सकारात्मक भूमिका घेत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव के. पी.बक्षी यांनी सांगितले की,देशात २०२३ पर्यंत ४०० गिगावॅट पवन ऊर्जा निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. त्यापैकी सुमारे २०० गिगावॅट निर्मिती पूर्ण झाली असून उर्वरित काम वेगाने सुरू आहे.कळंब प्रकल्पाच्या यशस्वी पूर्ततेसाठी जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासनाचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी नमूद केले.

पोलीस अधीक्षक रितू खोखर म्हणाल्या की,कळंब पवन ऊर्जा प्रकल्प टप्पा-१ पूर्ण होणे ही आनंदाची बाब आहे.शेतकरी व कंपन्यांमध्ये समन्वय राखण्यात पोलिसांनी महत्त्वाची भूमिका बजावली.नवीकरणीय ऊर्जा निर्मिती हा मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून,पुढील टप्पे निश्चित वेळेत पूर्ण होतील. कंपनीच्या आवारात सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात येत असून साहित्य चोरीच्या घटनांवर आळा बसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सेरेंटिका रिन्यूएबल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षय हिराचंदानी म्हणाले की,कठोर परिश्रम व समाजाचा सहभाग असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. प्रशासनाने वेळोवेळी सहकार्य केले. राज्यात १२०० मेगावॅट ऊर्जा निर्मितीचे नियोजन असून त्यातील मोठा हिस्सा धाराशिवमध्ये उभारला जाणार आहे.कंपनी सामाजिक बांधिलकी जपत स्थानिक प्रश्न सोडविण्याचेही काम करत आहे. पवन ऊर्जा निर्मिती हे आव्हानात्मक काम असूनही ते यशस्वीपणे पूर्ण करण्यात आम्ही पुढे आलो आहोत, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान,कळंब पवन ऊर्जा प्रकल्प टप्पा-१ यशस्वीपणे सुरू करण्यात प्रशासन व पोलीस यंत्रणेचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याबद्दल सेरेंटिका कंपनीतर्फे सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव के.पी.बक्षी यांच्या हस्ते संबंधित अधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ,पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन सुरजीत नारायण यांनी केले.

पवन,सौर आणि जल अशा नवीकरणीय ऊर्जास्रोतांमुळे पर्यावरणाचे संरक्षण होत असून कार्बन उत्सर्जनात घट होते. पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून शाश्वत विकासाचा मार्ग मोकळा होतो.कळंबसारखे प्रकल्प केवळ औद्योगिक गुंतवणूक वाढवणारे नसून ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा आणि स्थानिक विकासालाही चालना देणारे ठरत आहेत.त्यामुळे धाराशिव जिल्हा नवीकरणीय ऊर्जेच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

## स्वाधार योजनेसाठी ८ मे अंतिम मुदत: त्रुटीपुर्तता व हार्डकॉपी जमा न केल्यास अर्ज अपात्र

धाराशिव (जिमाका) डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५-२६ करिता त्रुटीपुर्तता करणेची व हार्डकॉपी जमा करण्याची अखेरची मुदत ८ मे २०२६ पर्यंत असल्याची महत्त्वाची सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात आली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या तसेच शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील इयत्ता ११ वी,१२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे यासाठी भोजन भत्ता,निवास भत्ता व निर्वाह भत्ता तसेच इतर शैक्षणिक सुविधा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार या योजनेमधून उपलब्ध करून देण्यात येतात.वसतिगृह प्रवेश व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत.त्यानुषंगाने सन २०२५-२६ करिता स्वाधार योजनेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पडताळणी करण्यात आलेली असून एकूण १७६५ प्राप्त अर्जांपैकी २२ विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीमध्ये आहेत,तर ५० विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत हार्डकॉपी (ऑनलाईन प्रणालीवर भरलेल्या अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे) समाज कल्याण कार्यालयात जमा केलेली नाही.

या बाबतीत संबंधित विद्यार्थ्यांना वेळोवेळी भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात आलेले असूनही अद्यापपर्यंत विद्यार्थ्यांनी त्रुटीपुर्तता व आवश्यक कागदपत्रे कार्यालयात जमा केलेली नाहीत.

तरी ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत त्रुटीपूर्तता केलेली नाही व अर्जाची हार्डकॉपी (अर्ज व आवश्यक कागदपत्रे यांचा संच) समाज कल्याण कार्यालयात जमा केलेली नाही, अशा विद्यार्थ्यांनी अंतिम मुदत दिनांक ८ मे २०२६ पूर्वी त्रुटीपूर्तता करून आवश्यक कागदपत्रे समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे जमा करावीत.

यानंतर मुदतवाढ मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.विहीत मुदतीत त्रुटीपूर्तता व आवश्यक कागदपत्रे कार्यालयास जमा न केल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी, असे आवाहन श्री सचिन कवले, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,धाराशिव यांनी केले आहे.

## फ्रँचायझी २.० योजनेद्वारे टपाल सेवा अधिक गतिमान; स्थानिकांना रोजगाराची सुवर्णसंधी

धाराशिव (जिमाका)- टपाल विभागाची फ्रँचायझी २.० योजना - जनतेसाठी अधिक सुलभ व जलद टपाल सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भारतीय टपाल विभागामार्फत नागरिकांना अधिक वेगवान,सुलभ व जवळच्या ठिकाणी टपाल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी फ्रँचायजी २.० योजना सुरू करण्यात आली आहे.या योजनेद्वारे स्थानिक उद्योजक, दुकानदार व इच्छुक व्यक्तींना अधिकृत फ्रँचायझी भागीदार म्हणून कार्य करण्याची संधी उपलब्ध होत असून,टपाल सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे**

या योजनेअंतर्गत स्पीड पोस्ट, नोंदणीकृत टपाल,पार्सल बुकिंग व टपाल वितरण सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जलद व कार्यक्षम सेवा देण्यावर भर देण्यात आला आहे.यामुळे स्थानिक युवकांसाठी स्वयंरोजगाराची संधी निर्माण होणार असून ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये टपाल सेवांचा विस्तार होणार आहे.तसेच टपाल विभागाच्या देखरेखीखाली विश्वसनीय सेवा नागरिकांना मिळणार आहे.

**कोण अर्ज करू शकतो**

आवश्यक जागा,मूलभूत सुविधा व निर्धारित पात्रता असलेले इच्छुक नागरिक या योजनेसाठी अर्ज करू शकतात.इच्छुकांनी आपल्या जवळच्या मुख्य टपाल कार्यालयाशी किंवा विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

फ्रँचायजी २.० ही योजना टपाल सेवांचा विस्तार,डिजिटल सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मिती यांचा प्रभावी संगम आहे.या योजनेमुळे टपाल सेवा अधिक लोकाभिमुख व परिणामकारक होणार असून,सर्व इच्छुकांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन श्री यस.पी.मालकर,अधीक्षक डाकघर धाराशिव विभाग,धाराशिव यांनी केले आहे.

## श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय आता शासकीय जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीचा नवा अध्याय; राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय-मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने चालवले जाणारे तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय आता पूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात जाणार आहे. राज्य मंत्रिमंडळाने या महाविद्यालयाच्या शासनाकडे हस्तांतरण करण्याच्या महत्वपूर्ण निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे या भागातील शैक्षणिक क्षेत्राचा चेहरामोहरा बदलणार असून आपण सातत्याने केलेल्या प्रयत्नांना आता यश मिळाले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे

मागील अनेक वर्षांपासून हे अभियांत्रिकी महाविद्यालय मंदिर संस्थानमार्फत चालवले जात आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ८ जुलै २०२५ रोजी बैठक झाली होती. त्यात तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनास हस्तांतरित करण्याच्या अनुषंगाने तसेच ही कार्यवाही सुकरपणे पार पडावी याकरिता पाच सदस्यीय तज्ञांची समिती गठित करण्यात आली होती. समितीने ऑगस्ट २०२५ मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार आता उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाला आता ’शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय’ असा दर्जा मिळणार आहे. यामुळे महाविद्यालयाच्या सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाच्या थेट नियंत्रणामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होईल, ज्याचा वापर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केला जाईल. महाविद्यालयात आधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय आणि अद्ययावत संगणक कक्ष उपलब्ध होतील. शासकीय दर्जा मिळाल्यामुळे या ठिकाणी अनुभवी आणि तज्ज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती होण्यास मदत होईल. शासकीय नियमांनुसार शैक्षणिक शुल्कात सवलत मिळणार असल्याने ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल पण गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे अभियांत्रिकी शिक्षण घेणे सहज शक्य होणार आहे तसेच महाविद्यालयाचा दर्जा सुधारल्यामुळे मोठ्या कंपन्यांमार्फत होणाऱ्या ’कॅम्पस प्लेसमेंट’मध्ये वाढ होईल, ज्यामुळे स्थानिक तरुणांना नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होतील. तुळजापूर आणि संपूर्ण धाराशिव जिल्ह्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे. आतापर्यंत येथील विद्यार्थ्यांना दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षणासाठी पुणे, छत्रपती संभाजीनगर किंवा मुंबईसारख्या शहरांकडे धाव घ्यावी लागत होती. मात्र, आता आपल्याच परिसरात जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधा असलेले शासकीय महाविद्यालय उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार आहे.

शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय हे मराठवाड्यातील एक प्रमुख शैक्षणिक केंद्र म्हणून नावारूपास येईल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

**हा निर्णय म्हणजे दुग्धशर्करा योग: आमदार पाटील**

एकीकडे तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामांचा लवकरच शुभारंभ होत आहे. धाराशिव-तुळजापूर रेल्वेमार्गाचे कामही अंतिम टप्प्यात असून आता तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासकीय होण्याचा निर्णय म्हणजे दुग्धशर्करा योग आहे. श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासकीय करण्यासाठी आपला सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू होता. या निर्णयामुळे जिल्ह्याच्या अर्थकारणाला बळकटी मिळणार असून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण तर मिळणार आहेच, त्याचबरोबर तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या खर्चात देखील कपात होणार आहे. मराठवाड्यातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे. महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगप्रमाणे वेतन मिळण्याचा मार्गही सुकर होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

**देवेंद्रजी फडणवीस, चंद्रकांत दादा व मंत्रिमंडळाचे विशेष आभार.**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी या विषयावर सातत्याने अनेक बैठका घेत, विविध प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणींवर सखोल चर्चा करून



मार्ग काढला. तसेच अनेक अडचणी आणि प्रक्रियात्मक गुंतागुंत असतानाही मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी या महत्त्वपूर्ण निर्णयाला सकारात्मक भूमिका घेत अंतिम मंजुरी दिली. तुळजापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी घेतलेल्या या दूरदृष्टीपूर्ण निर्णयाबद्दल मुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तसेच राज्य मंत्रिमंडळाचे मनःपूर्वक आभार!

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## भाजपाला मिळालेले यश

देशाचे लक्ष असलेल्या प.बंगालमधील निकाल भाजपाच्या बाजूने लागला. तीन वेळा सत्ता हस्तगत करणारी ममता बॅनर्जी यांना पायउतार व्हावे लागले. तसेच आसाममध्येही पुन्हा भाजपाला सत्ता मिळविण्यात यश आले. कॉंग्रेसपक्षाकडे केरल मध्ये यश मिळविता आहे. देशात कॉंग्रेसची एकेकाळी सत्ता असताना अनेक राज्यातून पायउतार व्हावे लागले. भाजपा व मित्र पक्षाच्या ताब्यात आता बावीस राज्य आले आहेत. आता तरी कॉंग्रेस जनतेसोबत राहाणे आवश्यक आहे. कॉंग्रेस पक्षाची कमान राहुल गांधी यांनी हाती घेतल्यापासून अपयश येतच आहे ते थांबण्यास तयार नाही. त्यामुळे कॉंग्रेस पक्षात लवकरच बंडाळी निर्माण होण्याची शक्यता आहे. वास्तविक कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख राहुल आणि प्रियंका गांधी यांनी देशातील परिस्थितीवर आवाज उठविला पाहिजे. केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टिका करण्याबरोबर शिव्या घातल्या जातात. हेच जनतेला आवडत नाही. जनतेला विनाकारण शिव्या कोणी-कोणाला देणे आवडत नाही. वास्तविक पंतप्रधान मोदी यांची चुका केल्या, गैरप्रकार केला तर टिका केली तर चालेल. विनाकारण शिव्या कशाला देतात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दंडे मारेंगे असे वक्तव्य राहूल गांधी करतात. हे शोभत नाही. जनतेसाठी दंडे खाण्यात पाठ मजबुत आहे असे वक्तव्य मोदी यांनी केले आहे. म्हणजे राहुल गांधी यांच्या बिनबुडाच्या आरोपाकडे दुर्लक्ष केले जाते हे लक्षात येते. वास्तविक कॉंग्रेसने विचार केला पाहिजे की, आपणास यश का येत नाही. जनता का स्विकारत नाही. लोकशाहीत सत्ताधाऱ्यापेक्षा विरोधकांना अधिक महत्व आहे. सत्ताधाऱ्यावर अंकुश ठेवण्याचे काम विरोधकांचे आहे. त्यासाठी प्रचंड अभ्यास असणे आवश्यक आहे. जगात भारतीय पंतप्रधानाचा डंका होत आहे. जगात भारताचे नाव गाजत आहे. अशा स्थितीत भारतीय नागरिक पंतप्रधानाच्या आवाहानाकडे दुर्लक्ष कसे करतील. प. बंगाल मध्ये काय चालले आहे हे देशातील नागरिकांनी पाहिले आहे. आता प. बंगालमध्ये जावून माहिती घेण्याची गरज नाही. किती घुसखोरांनी देश पोखरला आहे. बांगलादेशीय नागरिकांचा ममता बॅनर्जी मतासाठी किती लाड केले हे कळून आले. गोमातेचे मांस खाण्यासाठी सरकारकडून प्रोहत्सान दिले जात असेल तर जनता खपवुन कशी घेईल? जनतेनी परदेशीयांचा अन्यायाबरोबर अत्त्याचार सहन केला आहे. कोणाचाही द्वेश करू नये मात्र भारतमातेच्या विरोधात जात असाल तर ते कोणताही भारतीय खपवुन घेणार नाही. प. बंगालमध्ये विक्रमी मतदान झाले यामागील भाजपाने आखलेली रणनिती आहे तीला यश आले आहे. देशात प.बंगाल असा प्रांत होता की, येथे हिंदु म्हणण्यापेक्षा भारतीयांवर अन्याय, अत्त्याचार केले जात होते. तेही उघडपने हे योग्य नाही. मतासाठी देशा विरोधात जाल तर जनता निश्चित तुमची जागा दाखवुन देणार, ममताची हार एवढी दु:खद होईल असे वाटले नव्हते. विधानसभेत पराभव पत्कारावा लागला. एवढी जनता नाराज ममतावर होती, हे निकालानंतर दिसून येते. जे लाड पुर्वजांनी केले, त्यामुळे आज ते लोक मिरे वाटत आहेत. ते भारतीय सहन करीत आहेत. प. बंगालमध्ये कट्टर भारतीयांनी एकजुट दाखविली व भाजपाला विजय मिळवुन दिला. एक तर भाजपाला याही वेळी विजय मिळेलच असे वाटत नव्हते. जनतेची साथ भाजपाला दिली कारण अखंड भारत राहावा. यावेळी ममता बॅनर्जींची सत्ता आली असती तर जसे जम्मूकाश्मीर मधुन हिंदुंनी घरदार सोडून इतर राज्यात राहावे लागले तीच स्थिती प.बंगालमधील हिंदुंची झाली असती. ममता बॅनर्जी यांचा पुर्ण पाठींबा अहिंदुंना असता, ममता बॅनर्जींना अहिंदुवर मोठा विश्वास होता म्हणून त्या पराजित झाल्या. अहिंदुनासुद्धा माहिती होते की, ज्या हिंदुच्या जोरावर सत्ता, नाव कमविले त्याला त्या खुद्दार राहील्या नाहीत तर मग आपल्यापाठीशी कशा उभा राहातील? असा विश्वास असल्याने व राज्यात सुख, समाधान व शांतीसाठी अहिंदुनीसुद्धा भाजपाला मदत केली आहे. सुख, समाधान व शांती असेल तरच समाज आनंदी राहातो. हे आता देशातील अहिंदुना कळून आले आहे. हे सत्यही आहे. जेथे सत्ताधारी अहिंदुंचा लाड करीत होते तेथे बदल दिसून येत आहे. देशातील नागरिकांनी विचार करावा की, आपला देश सोनेची चिडीया होती. देव-देवतांचे मंदीर हे सोन्याचे होते. अशी सोन्याची मंदीरे, देवस्थान कोणी लुटले! विचार करा! आज देशात प. बंगाल सारखी स्थिती आणखीन कोणकोणत्या राज्यात आहे. आजही काही प्रांत केवळ भारतात आहेत, मात्र चालीरिती, खानपान, वागणे व संस्कार कोणत्या देशातील आहेत. विचार करा. आज प.बंगालची नागरिक मग कोणत्याही जाती-धर्माचे असोत ते विचारी आहेत. आगामी संकट कळाल्याने ममतांना विजय होता आले नाही. ममता बॅनर्जी ह्या परदेशीय नाहीत. आपल्या देशातील आहेत मात्र त्यांची वागणुक, विचार हे परदेशीय असल्याने जनतेनी त्यांची जागा दाखवुन दिली आहे. भारतीय जनता हुशार व सुसंस्कारी आहे, त्यामुळे योग्य वेळी निर्णय घेत आहे. सर्वात देश महत्त्वाचा आहे. देशातील संस्कृती टिकविणे आवश्यक आहे. असे असताना हिंदुद्वेश करणारी मंडळी अधिक काळ सत्ता चालवु शकत नाही. ममतांनी योग्य न्यायी वृत्तींने वागले असते. समसमान न्याय दृष्टिने पाहिले असते तर त्यांना परत राज्य मिळविता आले असते. त्या त्यांच्या कर्मानुसार पराभुत झाल्या आहेत. देशातील जनतेचा लोकशाहीवर विश्वास आहे. आज महाराष्ट्रात कॉंग्रेस सोडली तर इतर पक्षाने आपल्याच पायावर दगड मारून घेतला आहे. नसता आजही महाराष्ट्रात सेना-भाजपाची सत्ता असती. चुकीच्या व्यक्ती बरोबर किंव्हा चुकीच्या गाडीत बसलो तर प्रवास चुकीचा होतो. भाजपा फार काही चांगली आहे अशातली बाब नाही. तर आज देश सांभाळण्यात सक्षम आहे.जगात वचक आहे. अहिंदुना त्यांची जागा दाखवित आहेत म्हणून देशातील जनता भाजपाच्या पाठीशी आहे. म्हणून पुर्वी पेक्षा विक्रमी मतदान असाता होत आहे. म्हणून आज ममताला घरी बसविण्याचे काम भाजपाने नाहीतर जनतेनी केले आहे याचा विचार केला पाहिजे.

# कला मानव्यविद्या शाखा; अमर्याद संधींचे प्रवेशद्वार !!!

साधारणपणे पारंपरिक पदवी कला, विज्ञान, वाणिज्य शाखा सर्वपरिचित आहेतच. यातील कला शाखेचा समावेश मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्रे या विभागांतर्गत होतो. मानवी शास्त्र आणि सामाजिक शास्त्र हे एकंदरित मानवी वर्तन, मूल्य, इतिहास, तत्त्वज्ञान, भाषा, कला, साहित्य तसेच समाजातील मानवी संबंध, समाज रचना, प्रशासकीय, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक वातावरण इत्यादी यांचा संशोधनात्मक व वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारी शास्त्र होय. मानवी संस्कृतीचा अर्थ समजून मानवी कृतीमधील का थहू समजून घेणारे शास्त्र होय. सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक समस्यांचा विश्लेषणात्मक, चिकित्सक, चर्चात्मक, व्याख्यानात्मक पद्धतीच्या आधारे समस्येच्या मुळाशी जाऊन त्या सुधारणा घडवून आणणे तसेच प्रयोगांच्या माध्यमातून सांख्यिकीय व गुणात्मक तथ्यांचा वापर करून क्रांती घडविणे व मानवाचे कल्याण करणे हा असा हेतू असतो.

व्यक्तिमत्त्व विकास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व सर्वार्थाने यशस्वी जीवनासाठी कला शाखेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कला शाखा ही केवळ शिक्षणाची किंवा फक्त नोकरीची हमी देणारी शाखा नाही तर ती माणूस घडविण्याची कार्यशाळा आहे. कला शाखेचा आयाम इतका व्यापक आहे की, तो समजून घेण्यासाठी व्यापक दृष्टीची गरज आहे, जी आज हरवत चालली आहे असे भासते. कला शाखेमध्ये विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता व गुणवत्तेला आकाश स्वातंत्र्य असताना करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असूनही आपण ठराविक करिअरच्या मागे MOB Psychology नुसार लाखोंच्या संख्येने मुलांना यंत्रांचे गुलाम बनवत आहोत का? यावर एकदा विचार करावा. मेडिकल इंजिनियरिंगचे शिक्षण घेताना जीवघेण्या स्पर्धेतून विद्यार्थी आज जात आहेत त्यामुळे मानसिक शारीरिक ताण-तणाव झेलून त्यातील काहीजण डॉक्टर, इंजिनियर झाले तरी देखील स्पर्धा राहतेच, काही जणांना खूप कमी वेतनावर नोकरी करावी लागते. या उलट कला शाखा विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवते. यामध्ये विद्यार्थी विचारशक्ती, लेखन, कौशल्य, अभिव्यक्ती, आकलन, संवाद, व्यवस्थापन, भाषाशैली, मूल्य ज्ञान, सामाजिक भान यात पारंगत होतो. कला शाखेची हीच ताकद आहे. ती विद्यार्थ्यांची वैचारिक शक्ती जागृत करते. त्यांच्यातील सुप्त कला कौशल्यांना वाव देते. ज्यामुळे विद्यार्थी संवेदनशील बनतो.

जीवनमूल्ये व सामाजिक बांधिलकी

कला शाखेतील विषय, लोकप्रशासन, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, पर्यावरण शास्त्र, समाजशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा विषय, संगीत, चित्रकला, नृत्य व क्रीडा इत्यादी हे सर्वच विषय केवळ परीक्षेपूर्वी मर्यादित नाहीत तर यामुळे जीवनाच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी दिशा मिळते, हे विषय विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी विकसित करतात तसेच विद्यार्थ्यांना उपयोजित -pplied ज्ञान देतात. जे दैनंदिन जीवनात व करिअरमध्ये उपयुक्त ठरतात. हे विषय विद्यार्थ्यांचा बौद्धिक पाया भक्कम करून त्यांना सुजाण सजग नागरिक बनवतात. त्यांच्यात अंतर्बाह्य परिवर्तन घडवतात. विद्यार्थ्यांमध्ये एक मानवतावादी दृष्टिकोन विकसित करण्याची जबरदस्त ताकद या शाखेमध्ये आहे. जीवनातील कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नैतिक बळ देते त्यामुळे कला शाखा माणसातील माणूसपणा घडवणारी कार्यशाळा आहे.

सृजनशीलता

कला शाखा म्हणजे सृजनतेचा खजिना आहे. या शाखेतील विद्यार्थी जिज्ञासू व चाणाक्ष असतील तर त्यामधून चाणक्य कौटिल्य बनू शकतील, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर बनू शकतील, जगतज्योती महात्मा बसवेश्वर बनू शकतील, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, शिक्षण महर्षी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, धडाडीचे हुशार नेतृत्व इंदिरा गांधी, समाजाचे निःस्वार्थ सेवा करणाऱ्या सिंधुताई सपकाळ व बाबा आमटे, भ्रष्टाचार विरोधी उपोषण करणारे अण्णा हजारे बनतील, संसदेत व राज्य विधानसभेत जनतेच्या समस्या रोखठोकपणे मांडणारे विलासराव देशमुख बनतील, राजकारणात नैतिकता व गुणवत्तेला प्राधान्य देऊन कार्य करणारे आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर बनू शकतील, गुन्हेगारीला आळा घालणारे विश्वास नांगरे पाटील, किरण बेदी बनू शकतील, सामान्यांना न्याय देण्यासाठी पराकाष्ठा करणारे ज्येष्ठविधीज्ञ राम जेठमलानी, ॲड. उज्ज्वल निकम बनू शकतील, नि:पक्षपातीपणे न्यायदान करणारे न्यायाधीश चंद्रचूड, न्यायाधीश भगवती बनू शकतील, उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी अविनाश धर्माधिकारी, राजेश कुमार मीना, स्मिता सबरवाल, दुर्गाशक्ती नागपाल बनू शकतील, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा झेंडा अभिमानाने उंचावणारे कपिल देव, सचिन तेंडुलकर, सानिया मिर्झा, विश्वनाथ आनंद बनतील, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलाकार पं.शिवकुमार शर्मा, पं.हरिप्रसाद चौरसिया गाणकोकिळा लता मंगेशकर, एम एफ हुसेन ,अमिताभ बच्चन बनू शकतील, संगीतकार ए आर रहमान, अजय अतुल बनू शकतील, मराठी नाट्यसृष्टीचे जनक कुसुमाग्रज पु.ल .देशपांडे बनतील आणि भारताचे भविष्य उज्वल बनवू शकतील,

स्पर्धा परीक्षा व कला शाखा

स्पर्धा परीक्षा हा करिअरचा खरोखरच राजमार्ग आहे. मेहनत करून एकदा तुम्ही यशस्वी झालात की निवृत्तीपर्यंत तुम्हाला आर्थिक स्थैर्य, प्रतिष्ठा व अधिकार मिळतात. या अधिकारांचा वापर करून जनतेची सेवा करू शकतात. स्पर्धा परीक्षा म्हणजे आपणास एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. एवढे दोनच शब्द माहित असतात परंतु स्पर्धा परीक्षा म्हणजे परीक्षा व विविध पदांचा अथांग सागर आहे. यूपीएससी नागरी सेवेच्या सर्वोच्च पदासाठी परीक्षा घेते आयएएस, आयपीएस, आयएफएस, इंडियन इंजीनियरिंग सर्विसेस, इंडियन मेडिकल सर्व्हिसेस, इंडियन अग्रिकल्चर सर्व्हिसेस, कम्बाईन डिफेन्स सर्विसेस इत्यादी अशा महत्त्वाच्या पदांसाठी परीक्षा घेत असते.

एमपीएससी ही संस्था उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक, विक्रीकर अधिकारी, तहसीलदार, शिक्षण अधिकारी, पोलीस सब इन्स्पेक्टर, जीएसटी ऑफिसर, मंत्रालयातील कक्ष अधिकारी, सहाय्यक कक्ष अधिकारी, विभागीय अधिकारी, समाज कल्याण विभाग, महिला बालकल्याण विभाग, आरटीओ इन्स्पेक्टर, परिवहन विभाग, प्रोजेक्ट ऑफिसर, कृषी विभाग, महाराष्ट्र वन परीक्षा, सहाय्यक विक्री कर आयुक्त, उपनिबंधक, गट विकास अधिकारी इत्यादी अशा अनेक महत्त्वाच्या पदांसाठी परीक्षा घेऊन गुणवत्ताधारक उमेदवाराची निवड केली जाते.

तसेच विमा क्षेत्र, रेल्वे, स्टाफ निवड या पदांची भरती हजारोंच्या संख्येने होत असते. संयुक्त परीक्षा यामध्ये कोणताही पदवीधारक या परीक्षेत बसू शकतो. दरवर्षी २०,००० - २५,००० पदे या परीक्षेतून भरली जातात. या परीक्षा अंतर्गत सीबीआय इन्स्पेक्टर, कस्टमएक्साईज इन्स्पेक्टर, जनरल गव्हर्मेंट मिनिस्ट्री इन्स्पेक्टर, सेंट्रल गव्हर्नमेंट मिनिस्ट्रीच्या कार्यालयामध्ये सेक्शन ऑफिसर अशी महत्त्वाची पदे भरली जातात.

लिपिक पदासाठी स्वतंत्र परीक्षा घेतली जाते. सरळ सेवा भरती मधून महाराष्ट्र शासन ७२,००० जागा भरण्याच्या प्रक्रियेमध्ये आहे. या अनेक परीक्षांपैकी विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवीनुसार एकच परीक्षा द्यायची असते. तेवढ्याच परीक्षेचा अभ्यासक्रम पहायचा असतो. केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये लवकर यश मिळणाऱ्या उमेदवारांमध्ये कला शाखेच्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असते. कारण या विद्यार्थ्यांना या परीक्षांचा मूलभूत अभ्यासक्रम बी.ए.करताना स्पष्ट झालेला असतो तसेच अवांतर वाचनाला वेळ मिळतो, त्यामुळे एमपीएससी यूपीएससी व पोलीस भरतीत कला शाखेच्या सर्वाधिक विद्यार्थ्यांची निवड होताना निदर्शनास येते.आपण पाहत आहोत की विज्ञान-तंत्रज्ञान AI यामुळे जग खूप वेगाने विकसित होत आहे. प्रत्येक क्षेत्रात एआयचे मानवावर वर्चस्व निर्माण होत आहे म्हणजेच मानवी मन व मानवी मेंदूवर यंत्रांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यावर मानवतावादी दृष्टिकोन धोक्यात येण्याची शक्यता आहे त्यामुळे एआय सोबत हात मिळवणी करताना मूल्ये, नैतिकता, सामाजिक बांधिलकी, विवेक बुद्धी व माणुसकीची समाजात पुनर्प्राणप्रतिष्ठा करायची असेल तर ज्ञान, कला, कौशल्य, गुणवत्ता, तत्वे, सिद्धांत, अनुभव संधी-सेवा व आनंददायी शिक्षणाने समृद्ध अशा कलाशाखेचा सर्वोत्तम पर्याय असू शकतो.

कला शाखेतील विषयांचे महत्त्व

इतिहास हा विषय म्हणजे मानवी संस्कृतीचा आरसा असतो. मानवी प्रगतीचा क्रम शिकवतो. भूतकाळातील अनुभवातून वर्तमानात निर्णय कसे घ्यावेत हे शिकवणे व त्यामुळे भविष्यात विकासाकडे वाटचाल चालू राहते तसेच ऐतिहासिक घटनांचे चिकित्सक विश्लेषण करून माहितीची सत्यता पडताळण्याचे कौशल्य विकसित होतात. या विषयात इतिहास संशोधक पुरातत्त्व शास्त्रज्ञ शिक्षक प्राध्यापक पत्रकार म्युझियम क्युरेटर म्हणून करिअर करता येते.

लोकप्रशासन म्हणजे कृतीशील शासन होय. हा विषय शासन कोणते आणि कसे कार्य करते या प्रश्नांची उकल करतो. म्हणजेच प्रशासकीय यंत्रणा, शासकीय धोरणे, संविधान व कायद्याची अंमलबजावणी, व्यवस्थापन कौशल्य यासंबंधी सविस्तर ज्ञान देतो. आय.ए.एस, आय.पी.एस., आय.एफ.एस. व इतर सरकारी कर्मचारी-अधिकारी होण्यासाठी हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षक, प्राध्यापक, राजनीतिज्ञ, पत्रकार, संशोधक, वकील, M.B.A., ह्युमन रिसोर्सेस, मॅनेजमेंट, समाजसेवक, धोरण निर्मिती, विश्लेषक म्हणून करिअर घडवता येते. स्पर्धा परीक्षांसाठी हा विषय ऑप्शनल म्हणून अत्यंत महत्त्वाचा व अधिक स्कोरिंग चा विषय आहे.

राज्यशास्त्र हा विषय देशाची राजकीय वातावरण व शासन व्यवस्था याविषयी ज्ञान देतो. एक नागरिक म्हणून लोकशाही, निवडणूक, संसद, आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण, स्थानिक स्वराज्य संस्था, मूलभूत अधिकार समजण्यास मदत होते. राजकीय नेतृत्व राजकीय पक्ष व इतर देशातील शासन व्यवस्थेची तुलनात्मक अभ्यास व विश्लेषण या विषयाच्या माध्यमातून करता येते या विषयात राजकीय नेता वकील नागरी सेवा पत्रकार राजकीय विश्लेषक शिक्षक प्राध्यापक इत्यादी असे अनेक पर्यायातून करिअर करता येते.

तत्त्वज्ञान हा विषय भारतीय संस्कृतीच्या ज्ञानाचे भांडार आहे. यामध्ये भारतीय व पाश्चात्य विचारवंतांचे विचार अभ्यासता येतात. हा विषय विद्यार्थ्यांच्या विचारांना एक सकारात्मक दिशा देतो. जीवनात नैतिकता सत्य याविषयी सखोल मार्गदर्शन करतो. चिकित्सक विचार करायला लावतो या विषयाचे संशोधक नागरी सेवा, शिक्षक, प्राध्यापक, समुपदेशक, कथाकार, लेखन, संवादक क्षेत्र, प्रेरणादायी वक्ता असे अनेक करिअरचे पर्याय उपलब्ध होतात.

भूगोल या विषयांमध्ये पृथ्वीची जडणघडण नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, उपाय, हवामान, पर्यावरण इत्यादी आवश्यक संकल्पना या विषयात शिकवल्या जातात. नागरी नियोजन, हवामान शास्त्र, पुरातत्व शास्त्र, जीआयएस सारख्या क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असतात. समाजशास्त्र विषय शिकताना प्राप्त झालेल्या दृष्टीमुळे जर स्वतःच्या जीवनाचे समाजशास्त्र उलगडले तर विद्यार्थ्यांच्या जीवनात मुळापासून बदल होऊ शकतो. समस्यांच्या अभ्यासामुळे सामाजिक जाणीव विकसित होते व विद्यार्थी समाजातील जबाबदार नागरिक म्हणून तयार होतात. या विषयाचे शिक्षणामुळे समाजसेवक, संशोधक गैरशासकीय संघटनांमध्ये कार्याची संधी, प्रशासकीय सेवा, शिक्षक, प्राध्यापक, धोरण निर्मितीमध्ये सहभाग इत्यादी अमर्याद संधी उपलब्ध होतात. मराठी भाषा ही आपली मातृभाषा असल्याने प्रत्येक विद्यार्थी व नागरिकाला या भाषेचे ज्ञान आवश्यक आहे मराठी भाषेमुळे आपण आपल्या मातीशी व संस्कृतीशी संलग्नित राहतो. मराठी भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची योग्य पद्धत विकसित करते. मराठी भाषेच्या शिक्षणामुळे शिक्षक, प्राध्यापक, अनुवादक वृत्त संपादक, चित्रपट, नाट्यसमीक्षक, लेखन, स्पर्धा परीक्षेमध्ये करिअरच्या अमर्याद संधी उपलब्ध आहे.

हिंदी भाषा ही भारताची राजभाषा आहे. या भाषेच्या शिक्षणामुळे देशातील विविध भागांशी संवाद साधता येतो. तसेच मीडिया, सिनेमा, राजकारण या क्षेत्रांमध्येही हिंदीचा मोठा प्रभाव आहे. तसेच हिंदी भाषेतून उपलब्ध असलेल्या असलेले दर्जेदार साहित्य व ज्ञान अर्जित करायचे असेल तर हिंदी भाषेवर प्रभुत्व असावे लागते. या भाषेच्या ज्ञानाने शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, अनुवादक जाहिरात क्षेत्र व स्पर्धा, परीक्षेच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत.

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. जागतिक स्तरावर संवादासाठी आवश्यक आहे ही केवळ एक भाषा नाही तर कौशल्य आहे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्यावर इंटरनेट, विज्ञान तंत्रज्ञानाचा उपयोग प्रभावशालीपणे करता येतो. या भाषेचे शिक्षणामुळे कॉर्पोरेट क्षेत्र, पर्यटन, शिक्षक, प्राध्यापक, अनुवादक, जाहिरात क्षेत्र, लेखन व स्पर्धा परीक्षा करिअरच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत.

कलेचे महत्त्व

कला धरित्री मानवानां भूषणम्। कलाहीनः नरः पशुभिः समानः।। याचा अर्थ कला साहित्य हे मानवाचे खरे दागिने आहेत. जो कलाहीन आहे. तो पशु समान आहे. आजकाल युवा पिढीमध्ये सामाजिक माध्यमांच्या प्रभावामुळे मनाची एकाग्रता कमी होताना दिसत आहे. बहुतांशी तरुण पिढी असंवेदनशील बनताना दिसत आहे. योग्य-अयोग्य यातील भेद दाखवणारी विवेक बुद्धी जागृत ठेवण्यासाठी तरुणांमध्ये सकारात्मक भावना प्रवाहित ठेवण्यासाठी आपल्या भारतीय शास्त्रांमध्ये ६४ कलांचा उल्लेख केलेला आहे. ललित कला, चित्रकला, संगीत, नाटक, नृत्यकला, वाद्य इत्यादी कोणतीही कला मानवी जीवन अधिक समृद्ध व सुंदर बनवते. कला ही केवळ मनोरंजनासाठी नसून व्यक्तीच्या भावना, विचार व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. कलेमुळे मनाला आनंद मिळतो, कारण कला सादरीकरणातून व कलेचा आस्वाद घेण्यातून मेंदूमध्ये आनंदी संप्रेरके जे न्यूरो ट्रान्समीटर व रसायने निर्माण होतात ज्यांना डोपामीन, सेरेटोनिन, ऑक्सिटोसिन आणि एंडोर्फिन नावाने ओळखले जाते. या हॅप्पी हार्मोन्समुळे मेंदूची स्मरणशक्ती व कार्यक्षमता वृद्धिंगत होते. कलाविष्कारांमुळे आजचा तरुण वर्ग डिप्रेशन स्ट्रेस या शब्दांपासून लांब राहील.आज संगीतोपचार म्युझिक थेरपी ही जागतिक स्तरावर अनेक असाध्य रोगांवर रामबाण उपाय म्हणून प्रयोगात आणली जात आहे.

कला शाखेतून काय साध्य करता येईल?

कला शाखेत विद्यार्थ्यांना उत्कृष्ट संघटक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, शिक्षक, प्राध्यापक, लेखक, पत्रकार, समाजसेवक, कायदेतज्ञ, न्यायाधीश, मानसोपचार तज्ज्ञ, विचारवंत राजनेता, कलाकार, समुपदेशक अनुवादक, धोरण विश्लेषक, राजकीय समीक्षक असे अनेक पैलूंनी घडवण्याची क्षमता असते. त्यामुळे अनेक नामावंत सामाजिक संघटना, पोलीस प्रशासन, संशोधन करणाऱ्या संस्था खखडएठ असे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, कॉर्पोरेट रिसर्च केंद्र व राज्यातील प्रशासकीय यंत्रणेत, डेटा ऍनालिस्ट, पर्यटन, समुपदेशन, मार्गदर्शन, सोशल मीडिया, व्यवस्थापन, शासकीय व खाजगी क्षेत्र, लेखन आकाशवाणी व दूरचित्रवाणी निवेदक म्हणून कला शाखेतील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

वाचकांना हा लेख वाचताना कला शाखेतील आणखी दहा वीस क्षेत्रे नक्कीच आठवत असतील त्यामुळे फक्त गरज आहे. कला शाखेकडे पाहण्याचा दृष्टिकोन परिवर्तित करण्याची, शिस्तबद्ध अभ्यासाची व योग्य मार्गदर्शनाची.

कला शाखा म्हणजे फक्त अभ्यास नाही तर जीवन ही तिची प्रयोगशाळा आहे. कला शाखेमुळे विद्यार्थ्यांमधील कल्पकता व संशोधन वृत्ती वृद्धिंगत होते. त्यामुळे समाजातील समस्या समजून त्यावर उपाय शोधू शकतात. या शाखेमध्ये विद्यार्थ्यांना अध्यात्म, समाज, संस्कृती व मूल्ये यांची चांगली समज निर्माण होते. विद्यार्थ्यांची विचारशक्ती व संवाद कौशल्य सुधारते त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास बळावतो. आजच्या डिजिटल इंडियामध्ये माणुसकी जपणारा भारत जतन करायचा असेल तर अधिकाधिक युवकांनी कला शाखेची निवड करावी व स्वतःचे व्यक्तिमत्व घडवून भारत मातेचे संरक्षण करण्यास सहभागी व्हावे.

आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता ए.आय. च्या, माहिती तंत्रज्ञानाच्या काळातही कला शाखेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सर्व क्षेत्रात आपण कितीही प्रगती केली तरी माणूस म्हणून माणसाशी कसे वागावे, मानवी मूल्यांची जोपासना कशी करावी, समाज परिवर्तनामध्ये आपले कोणते योगदान असावे, राष्ट्रनिर्माण साठी आपलेही योगदान असावे याची व इतर नैतिक जीवन मूल्यांची शिकवण ही शाखा देते त्यामुळे आजही मानव्य विद्याशाखेच्या शिक्षणाची नितांत गरज आहे.



–डॉ. गीता गिरवलकर (शर्मा)
विभाग प्रमुख
लोकप्रशासन विभाग
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,
लातूर ९५०३१०९६४४


## उष्णतेमुळे तोंड आले ? माऊथ अल्सर म्हणजे दुखणे लहान पण वेदना फार , पाहा घरगुती उपाय

तोंडात लहान-लहान पांढरे फोड येणे, जळजळ होणे, खाणं-पिणं ही त्रासाचं होतं. या अवस्थेला आपण साधारण तोंड येणे म्हणतो. उष्णता वाढणे, तिखट-आंबट पदार्थ जास्त खाणे, पाण्याची कमतरता, झोप न होणे किंवा ताण यामुळे हा त्रास होऊ शकतो. जरी हे फोड काही दिवसांत आपोआप बरे होत असले, तरी त्या काळात होणारी वेदना खूप त्रासदायक असते. अशा वेळी काही सोपे घरगुती उपाय उपयोगी पडतात. पोट साफ नसेल तरी उष्णतेचा त्रास होतो, तोंड येते.

सर्वात सोपा उपाय म्हणजे थंडावा देणाऱ्या गोष्टींचा वापर. नारळाचं पाणी पिणं किंवा ताजं दही खाणं यामुळे शरीरातील उष्णता कमी होते आणि तोंडातील जळजळही कमी होते. त्याचप्रमाणे तुपाचा वापरही खूप फायदेशीर ठरतो. थोडंसं शुद्ध तूप थेट फोडांवर लावल्यास त्या भागाला ओलावा मिळतो आणि वेदना कमी होतात.

मध हा देखील एक प्रभावी घरगुती उपाय आहे. मधामध्ये नैसर्गिक जंतुनाशक गुणधर्म असतात. दिवसातून दोन-तीन वेळा थोडासा मध फोडांवर लावल्यास ते लवकर भरून येण्यास मदत होते. त्याचबरोबर हळदीचा वापरही करता येतो. हळद आणि थोडं पाणी किंवा मध मिसळून पेस्ट तयार करून फोडांवर लावल्यास सूज आणि वेदना कमी होतात.

तुळशीची पानेही या त्रासावर उपयोगी ठरतात. दोन-तीन तुळशीची पाने चावून खाल्ल्यास तोंडातील जंतू कमी होतात आणि फोड लवकर बरे होण्यास मदत होते. तसेच कोमट पाण्यात मीठ घालून गुळण्या केल्यास तोंड स्वच्छ राहते



आणि जखमा लवकर भरतात. मात्र मीठामुळे झोंबते. त्याची काळजी घ्या. त्याच प्रमाणे पेरुची पाने चावून खाणेही फायद्याचे आहे. तोंड आल्यावर त्यात जंतू होतात. त्यामुळेही त्रास होतो. म्हणून अँटीसेप्टीक गुणधर्म असलेले पदार्थ वापरावेत.

या काळात आहाराकडे विशेष लक्ष देणंही तितकंच महत्त्वाचं आहे. खूप तिखट, आंबट किंवा गरम पदार्थ टाळावेत. त्याऐवजी साधं, मऊ आणि थंडसर अन्न घ्यावं. भरपूर पाणी पिणं, फळं आणि भाज्यांचा समावेश करणं यामुळे शरीरातील उष्णता नियंत्रणात राहते. तोंड येणं हा साधारण त्रास असला तरी वारंवार होत असेल किंवा खूप दिवस बरा होत नसेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक आहे. मात्र रोजच्या आयुष्यात काही सोप्या सवयी आणि घरगुती उपाय अवलंबले, तर हा त्रास लवकर कमी करता येतो आणि पुन्हा होण्याची शक्यताही कमी होते.

# ममतांवरची जनतेची माया आटली



चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील झालेल्या निवडणुकीचे निकाल पाहिले, तर भारतीय जनता पक्ष वगळता उर्वरित पक्षांचे बालेकिल्ले ढासळले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षात पश्चिम बंगालसारखे मोठे राज्य भाजपने ममता बॅनर्जींकडून खालसा केले. तामिळनाडूमध्ये द्रविडी पक्षांच्या हातून पाच दशकानंतर सत्ता गेली. केरळ, आसाम आणि पुद्दुचेरीच्या निकालाबाबत फार काही अपेक्षाभंग झालेला नाही. देशातील चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशापैकी पश्चिम बंगालच्या निवडणुकीच्या निकालाकडे देशाचे सर्वाधिक लक्ष लागले होते. भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक आक्रमकतेने तोंड देणार्या आणि साध्या राहणीमधून जनमत पाठीशी असणार्या ममता बॅनर्जी यांची सद्दी लगेच संपेल, असे कुणाला वाटले नव्हते. 'एसआयआर'चा मुद्दा, ममता यांनी घोषणांचा पाडलेला पाऊस, मतांचे ध्रुवीकरण, महिला मतदारांचा भक्कम पाठिंबा आदींमुळे ममता यांचा गड वाचेल, असा निवडणूकपूर्व होरा होता; परंतु वाढलेल्या सहा टक्के मतदानाने ममतांवरची जनतेची माया आटली, हे स्पष्ट झाले. पश्चिम बंगालच्या राजकारणात यंदाच्या निवडणुकीने एक स्पष्ट संदेश दिला आहे, तो म्हणजे सत्तेची ताकद कितीही भक्कम असली, तरी जनतेचा विश्वास ढासळला, तर तिचा पाया हादरतोच. तृणमूल काँग्रेससाठी ही निवडणूक केवळ सत्तेसाठीची लढत नव्हती, तर प्रतिमेच्या पुनर्निर्मितीची कसोटी होती आणि त्यात भ्रष्टाचाराचे आरोप हा सर्वात मोठा अडथळा ठरला. शिक्षक भरती घोटाळ्यापासून ते राशन आणि मवेशी तस्करी प्रकरणांपर्यंत एकामागोमाग एक उघडकीस आलेल्या घटनांनी सत्ताधार्यांच्या विश्वसनीयतेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण केले. पार्थ चॅटर्जी यांची अटक आणि त्यांच्या निकटवर्तीयांकडे सापडलेली प्रचंड रोकड ही केवळ एक घटना राहिली नाही, तर भ्रष्टाचाराचे प्रतीक बनली. त्याचप्रमाणे अनुब्रत मंडल आणि ज्योतिप्रिय मल्लिक यांच्यावरील कारवाईने हा संदेश अधिक ठळक केला, की भ्रष्टाचार हा केवळ वरच्या पातळीपुरता मर्यादित नाही, तर तळागाळापर्यंत पोहोचला आहे. यासोबतच 'सिंडिकेट राज' आणि 'कट मनी' या संकल्पनांनी सामान्य नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यालाच ग्रासले.

**कमिशनची अनिवार्यता**

पश्चिम बंगालमध्ये बांधकामापासून सरकारी योजनांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर कमिशनची अनिवार्यता निर्माण झाल्याने सामान्य माणसासाठी जगणेच कठीण झाले. गरीबांसाठी असलेल्या योजनांमध्येच १० ते २५ टक्क्यांपर्यंत होणारी कपात हे केवळ आर्थिक शोषण नव्हते, तर ती 'माटी आणि मानुष' या घोषणेच्या विश्वासघाताची जाणीव करून देणारी घडामोड होती. ममता बॅनर्जी यांनी स्वतः कार्यकर्त्यांना पैसे परत करण्याचे आवाहन केले; पण तोपर्यंत नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने बंगालकडे केवळ निवडणूक म्हणून नाही, तर एक दीर्घकालीन राजकीय मोहीम म्हणून पाहिले. बूथस्तरापर्यंत केलेले सूक्ष्म नियोजन, केंद्रातील नेत्यांची सततची उपस्थिती आणि 'तुष्टीकरण'च्या मुद्द्यावर उभारलेला ठोस प्रचार यामुळे त्यांनी मतदारांमध्ये प्रभावी स्थान निर्माण केले. या आक्रमक रणनीतीमुळे तृणमूल काँग्रेसला बचावात्मक भूमिका घ्यावी लागली; मात्र सत्ताधार्यांसाठी सर्वात मोठा धक्का त्यांच्या पारंपरिक मतदारवर्गातूनच आला. महिलांचा पाठिंबा हा ममता बॅनर्जी यांच्या राजकारणाचा कणा मानला जात होता; पण संदेशखली आणि आर. जी. कर रुग्णालयातील महिला शोषणाच्या भीषण घटनांनी या विश्वासाला धक्का दिला. महिलांच्या सुरक्षेबाबत निर्माण झालेली शंका आणि प्रशासनावर झालेले आरोप यामुळे 'दीदी'च्या बालेकिल्ल्यातच तडे पडल्याचे दिसून आले. याशिवाय, पक्षांतर्गत मतभेद आणि नेतृत्वावरील प्रश्नांनी संघटनात्मक ताकद कमकुवत केली. जुन्या आणि नव्या नेतृत्वातील संघर्ष, तसेच काही महत्त्वाच्या नेत्यांचे दूर जाणे यामुळे तळागाळातील यंत्रणा ढासळली.

**सत्तेचा गर्व**

निवडणुकीसारख्या निर्णायक टप्प्यावर ममता बॅनर्जी यांची कमकुवतता स्पष्टपणे जाणवली. एके काळी रस्त्यावर संघर्ष करत सत्तेपर्यंत पोहोचलेले नेतृत्व सत्तेच्या गर्वात अडकते, तेव्हा त्याच संघर्षाची धार बोथट होते, याची प्रचिती या निकालातून आली. पश्चिम बंगालच्या मतदारांनी दिलेला कौल हा केवळ सत्तांतराचा नाही, तर जबाबदारीची जाणीव करून देणारा इशारा आहे. सत्तेचा अहंकार आणि व्यवस्थेतील दोष यांचा मेळ जुळला, की कितीही मजबूत किल्ला कोसळू शकतो, हे या निवडणुकीने पुन्हा अधोरेखित केले.

पश्चिम बंगालप्रमाणेच तामिळनाडूतही घडले. जयललिता यांच्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखालील अण्णाद्रमुकची शकले झाली. आता आपल्याला कुणीच स्पर्धक नाही, अशा समजुतीत द्रमुक राहिला. तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशमध्ये चित्रपटाचे वलय असलेले नेते यशस्वी होतात, हा इतिहास एम. के. स्टॅलिन विसरले. करुणानिधी आणि जयललिता यांना एम. जी. रामचंद्रन यांच्याप्रमाणे चित्रपटाची पार्श्वभूमी होती. त्यांचे फॅन क्लब्स होते. कमल हसन यांनी तसा प्रयत्न करून पाहिला. रजनीकांत यांनीही तसा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या धोरणात धरसोडपणा होता. अभिनेते थलपती विजय यांनी या चुका टाळल्या. त्यामुळे तामिळनाडूच्या राजकारणात नव्या अध्यायाची चाहूल लागली आणि या बदलाच्या केंद्रस्थानी अभिनेता ते नेता असा प्रवास करणारे थलपती विजय दिसत आहेत.

**यशस्वी अभिनेता**

तामिळनाडूमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये एक प्रकारची पोकळी निर्माण झाली होती. जयललिता यांच्या २०१६ मधील निधनानंतर आणि एम. करुणानिधी यांच्या २०१८ मधील निधनानंतर द्रविड राजकारणातील करिष्माई नेतृत्वाचा अभाव प्रकर्षाने जाणवत होता. अशा वेळी विजय यांचा उदय हा केवळ आणखी एका अभिनेत्याचा राजकारणात प्रवेश नसून तामिळनाडूच्या राजकीय प्रवाहात बदल घडवण्याची क्षमता बाळगणारा घटनाक्रम ठरत आहे.

तामिळनाडूमध्ये चित्रपट आणि राजकारण यांचे नाते ऐतिहासिक आहे. एम. जी. रामचंद्रन यांच्यापासून जयललिता आणि करुणानिधींपर्यंत पडद्यावरील लोकप्रियता हीच सत्तेच्या शिखरापर्यंत पोहोचण्याची शिडी ठरली; मात्र या परंपरेनंतरही गेल्या काही काळात नव्या करिष्माई नेतृत्वाची उणीव जाणवत होती. सध्याचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि त्यांचे पुत्र उदयनिधी स्टॅलिन यांचा चित्रपटक्षेत्राशी संबंध असला, तरी पूर्वसुरींप्रमाणे व्यापक जनाधार लाभलेला दिसत नाही. याच पार्श्वभूमीवर विजय यांचे व्यक्तिमत्त्व अधिक ठळकपणे समोर येते. विजय यांचा प्रवास हा केवळ यशस्वी अभिनेत्याचा नाही, तर सातत्याने जनमानसात आपली प्रतिमा घडवत नेणार्या व्यक्तीचा आहे. बालकलाकार म्हणून सुरुवात करून त्यांनी तामिळ चित्रपटात सुपरस्टार म्हणून स्थान मिळवले. त्यांच्या चाहत्यांचा उत्साह इतका प्रचंड आहे, की त्यांच्या चित्रपटांच्या प्रदर्शनावेळी पूजा-अर्चा, जल्लोष ही सामान्य बाब मानली जाते. 'थलपती' ही त्यांना लाभलेली उपाधीही केवळ चित्रपटातील प्रतिमेपुरती मर्यादित राहिली नाही, तर ती त्यांच्या नेतृत्वक्षमतेची ओळख बनली.

विजय यांची राजकारणातील एन्ट्री हा अचानक घेतलेला निर्णय नव्हता. २०२४ मध्ये त्यांनी 'तमिळगा वेत्री कळगम' या पक्षाची स्थापना केली आणि त्यासाठी चित्रपटसृष्टीपासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या पहिल्याच सार्वजनिक सभेला मिळालेला प्रचंड प्रतिसाद हा नव्या जनाधाराचा स्पष्ट दाखला होता. विशेष म्हणजे, त्यांच्या चाहत्या वर्गाने उभारलेले सामाजिक कार्याचे जाळे आधीपासूनच राजकीय वाटचालीसाठी भक्कम पाया घालून गेले होते. विजय यांनी आपल्या चित्रपटांतून सातत्याने सामाजिक प्रश्न मांडले. भ्रष्टाचार, शेतकर्यांच्या समस्या, निवडणूक प्रक्रियेतील त्रुटी यामुळे त्यांची प्रतिमा केवळ मनोरंजन करणार्या नायकाची न राहता, न्यायासाठी लढणार्या नेत्याची बनली. हीच प्रतिमा त्यांनी आता राजकारणात रूपांतरित करण्याचा प्रयत्न केला आहे.

विजय यांनी महिलांची सुरक्षितता, शिक्षण, सामाजिक न्याय आणि तमिळ अस्मिता या मुद्द्यांवर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तामिळनाडूच्या राजकारणात १९६७ पासून द्रविड मुनेत्र कझगम आणि अण्णाद्रमुक या दोन पक्षांचे वर्चस्व राहिले आहे. या दोन पक्षांभोवतीच राज्यातील सत्ता फिरत आली आहे, तर राष्ट्रीय पक्षांना दुय्यम भूमिका घ्यावी लागली; मात्र विजय यांच्या नव्या राजकीय प्रयोगामुळे या स्थिर समीकरणांना तडा जाऊ शकतो, अशी चिन्हे दिसत आहेत. एकूणच, विजय यांचा उदय हा केवळ एका अभिनेत्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचा भाग नाही, तर तामिळनाडूच्या राजकारणात नव्या पर्यायाच्या शोधाचा परिपाक आहे. पुढील काळात ते या अपेक्षांना कितपत न्याय देतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**नवे चेहरे**

दरम्यान, केरळ विधानसभा निवडणुकीत दिसून आलेले चित्र हे पारंपरिक समीकरणांना छेद देणारे ठरले आहे. उमेदवार निवडीपासून सामाजिक असंतोष आणि बाह्य आर्थिक घटकांपर्यंत अनेक स्तरांवर घडलेल्या बदलांनी या निवडणुकीला वेगळे स्वरूप दिले. विशेषतः काँग्रेसप्रणित 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट' (यूडीएफ)ने अवलंबलेली 'नवे चेहरे' ही रणनीती हा या निवडणुकीतील सर्वात निर्णायक घटक ठरल्याचे दिसते. तब्बल ९९ जागांवर नवीन उमेदवार देत 'यूडीएफ'ने थेट सत्ताविरोधी भावना ओळखून त्यावर प्रहार करण्याचा प्रयत्न केला. विद्यमान आमदारांना मोठ्या प्रमाणात डावलण्याचा निर्णय हा धाडसी असला, तरी मतदारांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्याच्या दृष्टीने तो परिणामकारक ठरला. याउलट 'एलडीएफ'ने तुलनेने मर्यादित बदलांची भूमिका घेतली. या विरोधाभासी दृष्टिकोनामुळे मतदारांच्या अपेक्षा आणि राजकीय संदेश यांच्यात स्पष्ट फरक जाणवला. बदलाची मागणी असलेल्या वातावरणात 'यूडीएफ'ने आक्रमकपणे घेतलेली भूमिका मतदारांना अधिक भावल्याचे दिसते. दरम्यान, किनारी भागातील मच्छीमार समाजातील असंतोष हा या निवडणुकीतील 'गेमचेंजर' ठरला.

**प्रवासी मतदारांची अनुपस्थिती**

केरळच्या सुमारे ४० मतदारसंघांवर प्रभाव टाकणार्या या समुदायाने तटीय संरक्षण, समुद्रकिनार्यावरील धूप, उपजीविकेतील अस्थिरता आणि पुनर्वसन धोरणांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली होती. विशेषतः समुद्रापासून दूर स्थलांतराच्या प्रस्तावांमुळे अनेक कुटुंबांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. या असंतोषाचा फटका सत्ताधारी लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंट (एलडीएफ) ला बसल्याचे दिसून येते. मतांच्या केवळ काही टक्के कलानेही सत्तासमीकरण बदलू शकते, हे या निकालाने अधोरेखित केले.

याशिवाय, प्रवासी मतदारांची अनुपस्थिती हा आणखी एक महत्त्वाचा घटक ठरला. आखाती देशांमध्ये कार्यरत असलेल्या केरळमधील मोठ्या मतदारवर्गाला यंदा विविध कारणांमुळे मतदानासाठी परत येणे शक्य झाले नाही. वाढते विमानभाडे, मर्यादित उड्डाणे आणि पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती यामुळे हजारो मतदार मतदान प्रक्रियेपासून दूर राहिले.

परंपरेने 'यूडीएफ'कडे झुकणारा हा मतदारवर्ग अनुपस्थित राहिल्याने अनेक मतदारसंघांतील लढती अधिक चुरशीच्या झाल्या. गॅसटंचाईचा प्रश्नही मतदारांच्या मनोवृत्तीवर परिणाम करणारा ठरला. पश्चिम आशियातील घडामोडींमुळे एलपीजी पुरवठ्यावर परिणाम झाला आणि त्याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिक तसेच पर्यटन आणि सेवा क्षेत्राला बसला. वाढती महागाई आणि दैनंदिन अडचणींमुळे सत्ताधार्यांविषयी नाराजी वाढल्याचे चित्र दिसले. एकंदरीत, केरळमधील ही निवडणूक केवळ पक्षीय स्पर्धा नव्हती, तर बदलाची मागणी, स्थानिक प्रश्नांची तीव्रता आणि जागतिक परिस्थितीच्या परिणामांचा संगम होती. मतदारांनी केवळ आश्वासनांवर नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित निर्णय घेतल्याचे या निवडणुकीत स्पष्टपणे दिसून आले.

--------------------------------

**राही भिडे , ज्येष्ठ पत्रकार**

# तुमच्या आरोग्यास निरोगी राखण्यासाठी .....

आधुनिक जीवनशैलीमुळे अनेक लोकांना आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. अनियमित दिनचर्या, ताणतणाव, अपूर्ण झोप आणि असंतुलित आहार यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. आरोग्य राखण्यासाठी दैनंदिन जीवनात काही साध्या पण प्रभावी उपायांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या ब्लॉग पोस्टमध्ये, तुमच्या दैनंदिन जीवनात आरोग्य कसे राखावे याबाबत काही महत्त्वाच्या टिप्स दिल्या आहेत, या टिप्स चा वापर करून निरोगी आयुष्य जगण्यास सुरुवात करू शकता.

**१. सकाळी लवकर उठणे**

सकाळी लवकर उठण्याचे अनेक फायदे आहेत. हे तुम्हाला फ्रेश आणि ॲक्टिव्ह ठेवते. पहाटेच्या थंड आणि ताज्या हवेत चालणे किंवा व्यायाम करणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. सकाळी ५ च्या दरम्यान उठल्यास दिवसभर आळस कमी येतो.

**२. नियमित व्यायाम करणे**

रोजच्या व्यायामामुळे शरीरातील सर्व अवयव निरोगी राहतात. व्यायामामुळे ब्लड सरकुलेशन सुधारते, पचनक्रिया सुधारते आणि वजन नियंत्रित राहते. योग, धावणे, चालणे, सायकल चालवणे किंवा जिममध्ये व्यायाम करणे हे चांगले पर्याय आहेत. रोजच्या व्यायामाची एक ठराविक वेळ असावी आणि दररोज किमान ३० मिनिटे तरी व्यायाम करावा.

**३. संतुलित आहार**

आरोग्यासाठी संतुलित आहार घेणे महत्त्वाचे आहे. आपल्या आहारात सर्व प्रकारचे पोषक घटक असावेत. यामध्ये प्रोटीन, व्हिटॅमिन, खनिजे आणि फायबर असणे आवश्यक आहे. फळे, भाज्या, धान्य, कडधान्ये आणि दुग्धजन्य पदार्थांचा आहारात समावेश करा.

**४. पुरेशी झोप**

पुरेशी झोप घेतल्याने शरीर आणि मन ताजेतवाने राहते. दररोज किमान ७-८ तासांची झोप घेणे आवश्यक आहे. झोप जर पूरक झाली नाही तर मानसिक आणि शारीरिक ताण वाढू शकतो.

**५. स्ट्रेस कमी करणे**

स्ट्रेस आणि चिंता आरोग्यावर निगेटिव्ह परिणाम करू शकतात. स्ट्रेस कमी करण्यासाठी मेडिटेशन, योग किंवा श्वसनाचे व्यायाम करणे फायदेशीर आहे. तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टींमध्ये वेळ घालवणे, पुस्तक वाचन, संगीत ऐकणे हे देखील ताण कमी करू शकतात.

**६. भरपूर पाणी पिणे**–दिवसभरात पुरेसे पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. पाण्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि त्वचा चमकदार राहते. दररोज किमान ८-१० ग्लास पाणी प्या. पाण्याच्या कमतरतेमुळे डिहायड्रेशन होऊ शकते, ज्यामुळे थकवा, डोकेदुखी आणि एकाग्रता कमी होण्याची शक्यता असते. पाणी पिल्याने शरीराच्या सर्व कार्यप्रणाली व्यवस्थित कार्य करतात. तुम्ही लिंबू, पुदीना किंवा फळांच्या तुकड्यांसह पाणी अधिक स्वादिष्ट करू शकता.**७. स्वच्छता पाळणे**–स्वच्छता पाळणे आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




वैवाहिक जीवन सुरळीत असली की मनुष्य आनंदी राहतो. परंतू अनेकदा असंतोष, सुख न मिळणे कमजोरी अशा काही समस्या उद्भवतात. अशात पुरुषांमध्ये कमजोरी डिप्रेशनचे कारण देखील होऊ शकतं. पण त्यात घाबरण्यासारखे काही नाही. पुरुषांमध्ये कमजोरी दूर करण्यासाठी काही घरगुती पदार्थ आहे ज्यामुळे नैसर्गिक रित्या या समस्या सोडवल्या जाऊ शकतात तर जाणून घ्या कोणते असे पदार्थ आहे जे सेवन केल्याने पुरुषांना नक्कीच फायदा होईल.कच्ची भेंडी चावून-चावून खाणे औषधीचे काम करेल.लसणाच्या दोन पाकळ्या झोपण्याआधी सेवन केल्याने फायदा दिसून येईल.

## २ Joke विनोद




**एका शिक्षिकेने विद्यार्थ्यांना क्रिकेट मॅचवर एक निबंध लिहायला सांगितला. तास संपत आल्यावर बाई निबंध पहायला गेल्या. एका आळशी मुलाने फक्त दोनच वाक्य लिहिली होती. ङ्गवाईट हवामान, पाऊस पडत असल्यामुळे क्रिकेटची मॅच होणार नाही.**

## ३ Message संदेश



Arj kiya hai....Jara gaur Farmayega !!
Kabhi tum gaur se dekho aaina
Kabhi tum gaur se dekho aaina
....tum bhi ho Made in China

## ४ Thought सुविचार




त्याग हा सर्व प्रकारच्या कलेचा बिंदूच आहे.
– महात्मा गांधी

**संस्कृत सुभाषित**

**विद्याघातो ह्यनभ्यासः, स्त्रीणां घातः कुचलैता ।। व्याधींना भोजनं जीर्णं, शत्रोर्धातः प्रपज्जता।। विद्या प्राप्त करण्यामध्ये अभ्यास**

अर्थः टाळणे हे घातक ठरते, मलिन-फाटकी वस्त्रे स्त्रीच्या सौंदर्याला घातक ठरतात, भोजन चांगले पचत असेल तर ते रोगांना घातक ठरते (अन्न चांगले पचल्यास रोग फिरकत नाहीत) आणि आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन शत्रूंना घातक ठरते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. सवड
४. नाणेफेक
८. टेचात, थाटामाटात
११. सैन्याचा मालपुरवठा
१३. घासात बारीक खडे यावेत तशी तापदायक बडबड
१६. खास खबर
१९. बेताचे गरम
२०. घाटा
२१. गोडी, आवड
२३. पदार्थ शिजतानाचा आवाज
२५. अंधार
२७. चामखीळ
२९. वास्तव्य, अस्तित्व
३०. सत्व
३१. चाकोरीसाठी मराठीत रूळलेली इंग्रजी शब्द
३३. उपहास
३४. विनाप्रयत्ने, सहजगत्या
३६. अपशकुन
३८. सरस-निरस (भाव)
४०. भारवाहक
४१. रानटी, जंगलातील
४२. अगदी दूर, पलीकडे
४५. श्रवणाचा अवयव
४८. वेळ घालविणे
४९. झोपाळा
५०. तमाशातील कलाकार
५३. पाढ्यांची उजळणी
५४. शिव्यशाप
५७. उंचसखल नसलेले
५८. सूर्याचे एक नाव
६०. भेग, चीर
६१. काठाकाठाने
६३. धावपळ, भीतीने पांगापांग
६५. शर्त, पण
६६. बटवा
६८. लव्ह लेटर पण मराठीत
७०. राजाची मुलगी
७२. कोलकताचे विमानतळ
७४. घट्ट, तणावपूर्ण
७५. सर्दीने बंद होणारे
७६. कलावंत
७९. धुंदी, कैफ
८३. पत्रातील सा.न.वि.वि.

### उभे शब्द

१. स्फुरण (पावणे)
२. फळातील द्रव
३. घर, निवास
५. शेराचा चौथा भाग
६. बिशाद, हिंमत
७. रोख पैसा, रोकड
९. कारभार, कामगिरी (हिंदी)
१०. घेराव, गराडा
१२. गहन
१४. डोईवरचा पूर्ण चंद्र!
१५. जिभेचे चोचले पुरवणारे
१७. आशीर्वाद
१८. क्रिकेटमधील सहा
२०अ. सहाआसनी रिक्षाला बोलीभाषेतील शब्द
२२. अगदी सारखे
२४. जीभ
२६. बोरबरी
२८. मजेसाठी पर्यटन
२९. गाईचे पिल
२९अ. सहाआसनी रिक्षाला बोलीभाषेतील शब्द
३२. पुरुष
३५. प्राण
३७. पत्र, डाक
३९. न्यारी, रीत!
४०. उचलबांगडी
४३. गूढ
४४. शंकराने धारण केलेल विष
४६. वर्तमानपत्र (हिंदी)
४७. स्वारांचे शास्त्र व कला
४८. पाणी वाढण्याचे भांडे
५०. काव्यात तुझे
५१. गोंधळ, थट्टा, भांडण
५२. समोर (हिंदी)
५५. काठ, किनारा
५६. बोटांनी दारावर आवाज
५७. रोखठोक, स्पष्ट
५९. कोयत्याचा साथीदार
६२. धमकी
६४. खाट, बाज
६५. बोकड
६६. नरमच्या विरुद्ध
६७. चार वेदांपैकी एक
६८. कधी रसिक, कधी बघ्या
७०. राधाकृष्ण (हिंदी)
७१. समतोल बुद्धीचा
७३. मज्जाव, बंदी
७७. लग्नाचे पारंपारिक मिष्टान्न
७८. पृथ्वी
७९. जोगीण (इंग्रजी)
८०. भारताचा राष्ट्रीय पक्षी
८१. पांडवांची आई
८२. पहिली रास

### आडवे उत्तरे

१.करवत ४.छापाकाटा ८.झकपक ११.रसद १३.कचकच १६.नवलविशेष १९.कोमट २०.तूट २१.रस २३.रटरट २५.तमस २७.मस २९.वास ३०.कस ३१.रूटीन ३३.टर ३४.सहजासहजी ३६.नाट ३८.तरतम ४०.हमाल ४१.वन्य ४२.पार ४५.कान ४८.कालहरण ४९.झूला ५०.तमासगीर ५३.परवचा ५४.तळतळाट ५७.समतल ५८.रम ६०.फट ६१.कडेकडेने ६३.पळापळ ६५.अट ६६.कसा ६८.प्रेमपत्र ७०.राजकन्या ७२.डमडम ७४.तंग ७५.नाक ७६.कलाकार ७९.नशा ८३.साष्टांग नमस्कार विनंती विशेष

### उभे उत्तरे

१.फुरफुर २.रस ३.वदन ५.पावशेर ६.टाप ७.रकम ९.करतूत १०.कडे १२.खोल १४.चकोट १५.चटपटीत १७.वर १८.षटक २०अ.टमटम २२.समसमान २४.रसना २६.टर २८.सहल २९.वासरु २९अ.सह ३२.नर ३५.जीव ३७.टपाल ३९.तऱ्हा ४०.हकालपट्टी ४३.रहस्य ४४.हलाहल ४६.समाचारपत्र ४७.संगीत ४८.कावळा ५०.तव ५१.रळफळ ५२.सामने ५५.तट ५६.टकटक ५७.सडेतोड ५९.मळा ६२.दम ६४.पलंग ६५.अज ६६.कडक ६७.साम ६८.प्रेक्षक ७०.राधेशाम ७१.न्यायी ७३.मना ७७.लाडू ७८.रसा ७९.नन ८०.मोर ८१.कुंती ८२.मेष



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### करो या मरो सामन्यात दिल्ली-चेन्नई मैदानात

**नवी दिल्ली**–इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा ४८ वा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात मंगळवारी अरुण जेटली स्टेडियमवर खेळला जाईल. हा सामना जिंकून दोन्ही संघ गुणतालिकेतील आपलं स्थान सुधारण्याचा प्रयत्न करतील. गुणतालिकेत मधल्या स्थानावर अडकलेल्या आणि प्लेऑफच्या जवळ पोहोचू इच्छिणाऱ्या दोन्ही संघांसाठी हा सामना महत्त्वाचा आहे. नऊपैकी चार सामने जिंकून दिल्ली कॅपिटल्स गुणतालिकेत सातव्या स्थानावर आहे, तर चेन्नई सुपर किंग्स नऊपैकी चार सामने जिंकून सहाव्या स्थानावर आहे. दोन्ही संघांनी जिंकला मागील सामना : सलग पराभवांना सामोरं गेल्यानंतर, दिल्ली कॅपिटल्सनं राजस्थान रॉयल्सविरुद्ध २२६ धावांचं लक्ष्य पूर्ण करुन आपल्या मोहिमेला पुनरुज्जीवित केलं. दरम्यान, चेपॉकमधील आपल्या मागील साम न्यात चेन्नई सुपर किंग्सनं मुंबई इंडियन्सचा मोठ्या फरकानं पराभव केला, जे त्यांच्या चांगल्या तयारीचं लक्षण आहे.राहुल आणि संजूवर असतील सर्वांच्या नजरा : या सामन्यात, चाहत्यांचं लक्ष डीसी आणि सीएसकेचे अनुक्रमे सर्वाधिक धावा करणारे दोन फलंदाज केएल राहुल आणि संजू सॅमसन यांच्यावर आहे. जबरदस्त फॉर्मात असलेल्या सॅमसननं १६८ च्या स्ट्राईक रेटनं ३१५ धावा केल्या आहेत.

### हैदराबादला येता येता पेशावरला गेला आणि ठरला फायनलचा शिल्पकार; अर्धशतक आणि ४ विकेट्स

कराची–जॅक एडवर्ड्स दुखापतग्रस्त झाल्यानंतर सनरायझर्स हैदराबाद संघ बदली खेळाडूच्या शोधात होता. त्यांच्या रडारवर आरोन हार्डीचं नाव होतं. हार्डी लिलावात अनसोल्ड गेला होता. त्यामुळे हैदराबादला संधी होती. पण त्यांनी डेव्हिड पायनेला घेतले. हार्डीला पाकिस्तान सुपर लीगमधल्या पेशावर झाल्मी संघाने करारबद्ध केले. हैदराबादच्या वाटेवर असतानाच हार्डी पेशावरला गेला. त्याच हार्डीने फायनलमध्ये ४ विकेट्स आणि अर्धशतकासह झाल्मी संघाला जेतेपद पटकावून दिले.
लाहोर इथल्या गद्दाफी स्टेडियमवर विक्रमी ३२,४६१ चाहत्यांच्या साक्षीने हार्डीने झाल्मी संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. पहिल्यांदाच समावेश झालेल्या हैदराबाद किंग्समेन संघाचा डाव आव्हानात्मक खेळपट्टीवर १२९ धावांतच आटोपला. सईम अयुबने ५४ धावांची एकाकी झुंज दिली. किंग्समेनच्या सहा फलंदाजांना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही. झाल्मी संघातर्फे आरोन हार्डीने २७ धावांत ४ विकेट्स घेतल्या.

### विराट कोहलीच्या जवळच्या व्यक्तीने १८ वर्षानंतर आरसीबीला केला अलविदा!

मुंबई–मागील १८ वर्षापासून विराट कोहली आरसीबीसाठी खेळत आहे, यंदा तो आरसीबीसाठी १९ वा सिझन खेळत आहे. आयपीएलमध्ये असे फार कमी खेळाडू आहेत जे पहिल्या सिझनपासून अजूनपर्यत आयपीएल खेळताना दिसत आहेत.
आता आरसीबीच्या संघातील महत्वाचा व्यक्तीने आरसीबीला अलविदा केला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या संघासाठी २००८ ते २०२५ या १८ वर्षामध्ये फ्रँचायझीसाठी सेवा पुरवणारे माजी मुख्य फिजिओ इव्हान स्पीचली यांनी आता आरसीबीला अलविदा केला आहे. हे आरसीबीच्या संघातील एक सर्वात जुन्या सदस्यांमधील एक आहेत.
आरसीबीच्या संघाने त्यांचा एक व्हिडिओ सोशल मिडियावर शेअर केला आहे यावेळी विराट कोहलीने देखील त्याच्या नात्याबद्दल सांगितले आहे.
कोण आहेत इव्हान स्पीचली? आरसीबीने सोशल मिडियावर एक व्हिडिओ शेअर केली आहे यामध्ये संघातील खेळाडू आणि स्टाफने माजी मुख्य फिजिओ इव्हान स्पीचली यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

### ममता ऐकायच्या नाहीत, ५ कोटी मागितले, टीम इंडियाचा क्रिकेटर निकालाच्या २४ तासात फिरला!

कोलकाता–पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा दारूण पराभव झाला आहे. २०७ जागा जिंकणारी भाजप पहिल्यांदाच पश्चिम बंगालमध्ये सत्ता स्थापन करणार आहे. तर ममतांच्या तृणमूल काँग्रेसला ८० जागा मिळाल्या आहेत. पश्चिम बंगालमधली सत्ता जाताच ममता बॅनर्जी यांच्यावर त्यांचाच सहकारी आणि टीम इंडियाच्या माजी क्रिकेटपटूने गंभीर आरोप केले आहेत. विधानसभेच्या तिकीटासाठी माझ्याकडे ५ कोटी रुपये मागितले गेले, ममता बॅनर्जी माझं ऐकत नव्हत्या, असं टीम इंडियाचा क्रिकेटपटू म्हणाला आहे.ममाझ्यासाठी तृणमूल काँग्रेससोबतचे संबंध आता पूर्णपणे संपलेले आहेत. मला तिकीट देण्यासाठी ५ कोटी रुपये मागण्यात आले होतेफ, असं भारताचा माजी क्रिकेटपटू मनोज तिवारी म्हणाला आहे. या आरोपानंतर मनोज तिवारीने टीएमसीमधून राजीनामा दिला आहे.

## १० मीटर एअर पिस्तूल शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये अंजली शेखावतचे सुवर्ण



नवी दिल्ली : २४व्या कुमार सुरेंद्र सिंग मेमोरियल शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये राजस्तानच्या अंजली शेखावत हिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात शानदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. सोमवारी झालेल्या अंतिम फेरीत अंजलीने २४०.५ गुण मिळवत अव्वल स्थान मिळवले.
अंजलीने पात्रता फेरीत ५७६ गुण मिळवत चौथे स्थान पटकावले होते. मात्र अंतिम फेरीत तिने दमदार पुनरागमन करत अचूक नेमबाजीच्या जोरावर सुवर्णपदक आपल्या नावावर केले. तिच्या या कामगिरीचे क्रीडा क्षेत्रात सर्वत्र कौतुक होत आहे.या स्पर्धेत हरियाणाच्या कनक बुधवारे हिने २३८.७ गुणांसह रौप्य पदक जिंकले, तर पंजाबच्या अगम रणजीत कौर ग्रेवाल हिने २१६ गुणांसह कांस्य पदक मिळवले.
पात्रता फेरीत तेलंगणाच्या ऑलिम्पियन ईशा सिंग हिने ५८२ गुणांसह अव्वल स्थान मिळवले होते. मात्र अंतिम फेरीत ती सहभागी झाली नाही. तसेच मध्य प्रदेशच्या महिमा तुर्ही अग्रवाल हिनेही अंतिम फेरीत प्रवेश केला नव्हता.याच स्पर्धेतील ज्युनियर महिला १० मीटर एअर पिस्तूल प्रकारातही हरियाणाच्या कनक हिने प्रभावी कामगिरी करत २३८.४ गुणांसह सुवर्णपदक पटकावले. प्रियांशी पूर्वा हिने २३७.५ गुणांसह रौप्य, तर केतन हिने २१६.८ गुणांसह कांस्य पदक जिंकले. युवा महिला गटातही कनकने २४४.३ गुण मिळवत आणखी एक सुवर्णपदक आपल्या नावावर केले. नव्या हिने २३७.७ गुणांसह रौप्य, तर लष्कराच्या अंजली महेंद्र भागवत हिने २१५.३ गुणांसह कांस्य पदक मिळवले.संघ प्रकारात हरियाणाच्या प्रियांशी पूर्वा, नव्या आणि सुरभी राव यांच्या संघाने एकत्रित १७१८ गुण मिळवत सुवर्णपदक पटकावले.या स्पर्धेत अंजली शेखावतच्या सुवर्णपदकामुळे राजस्थानच्या पदकतालिकेत महत्त्वपूर्ण भर पडली असून तिच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## संजू सॅमसन- कार्तिक शर्माची तुफान फटकेबाजी!

### सीएसके चा दिल्लीवर एकतर्फी विजय



**नवी दिल्ली:** आयपीएल २०२६ मधील ४८ व्या सामन्यात संजू सॅमसनच्या झंझावाती नाबाद ८७ धावांच्या जोरावर चेन्नईने दिल्लीचा ८ गडी राखून पराभव केला. दिल्लीने दिलेल्या १५६ धावांचे आव्हान चेन्नईने १५ चेंडू शिल्लक ठेवून सहज पूर्ण केले.

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ४८ वा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपर किंग्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सला एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागला आहे. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या दिल्ली कॅपिटल्सला ७ गडी बाद १५५ धावा करता आल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना संजू सॅमसनने नाबाद ८७ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्जने ८ गडी राखून आणि १५ चेंडू शिल्लक ठेवून विजय मिळवला.चेन्नई सुपर किंग्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या



१५६ धावा करायच्या होत्या. चेन्नईचा सध्याचा फॉर्म पाहता ही धावसंख्या फार मोठी नव्हती. पण धावांचा पाठलाग करताना चेन्नईला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. ऋतुराज गायकवाड अवघ्या ६ धावा करून माघारी परतला. त्यानंतर उर्विल पटेलने संजू सॅमसनसोबत मिळून हातभार लावला. पण उर्विल पटेल १७ धावांवर माघारी परतला. त्यानंतर शेवटी संजू सॅमसन आणि कार्तिक शर्माने मिळून शतकी भागीदारी केली. यादरम्यान संजू सॅमसन ५२ चेंडूंचा सामना करून ८७ धावांवर नाबाद राहिला. तर कार्तिक शर्माने ३१ चेंडूत नाबाद ४१ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर चेन्नईने हा सामना ८ गडी राखून आपल्या नावावर केला.

या सामन्यात दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण हा निर्णय फसला, कारण दिल्लीला हवी तितकी धावसंख्या उभारता आली नाही. सलामीला आलेला पथूम निसांका १९ धावांवर माघारी परतला. तर केएल राहुलने अवघ्या १२ धावा केल्या. नितीश राणा अवघ्या १५ धावांवर माघारी परतला. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आलेला करुण नायर अवघ्या १३ धावा करून माघारी परतला. कर्णधार अक्षर पटेल अवघ्या २ धावांवर बाद झाला. शेवटी ट्रिस्टन स्टब्सने ३८ धावांची खेळी केली. तर समीर रिझवी ४० धावांवर नाबाद राहिला. या खेळीच्या बळावर दिल्लीने १५५ धावांपर्यंत मजल मारली.

या विजयानंतर चेन्नईचा संघ गुणतालिकेत सहाव्या स्थानी कायम आहे. चेन्नईने आतापर्यंत १० पैकी ५ सामने जिंकले आहेत. तर ५ सामने गमावले आहेत. चेन्नईचा संघ सध्या १० गुणांसह गुणतालिकेत सहाव्या स्थानी आहे. तर दिल्लीचा संघ ८ गुणांसह सातव्या स्थानी

## महेंद्रसिंग धोनीच्या प्रकृतीत सुधारणा सुरूच; सिमन्स यांचे स्पष्टीकरण

चेन्नई : चेन्नई सुपर किंग्सचे गोलंदाजी प्रशिक्षक एरिक सिमन्स यांनी महेंद्रसिंग धोनी यांच्या प्रकृतीबाबत महत्त्वाचे अपडेट दिले असून, त्यांची प्रकृती हळूहळू सुधारत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या आगामी इंडियन प्रीमियर लीग सामन्यासाठी धोनी संघासोबत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.
धोनी या मोसमात पोटरीच्या दुखापतीमुळे अद्याप एकही सामना खेळलेला नाही. सिमन्स यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, धोनीबद्दल माहिती देणे माझ्या अधिकारक्षेत्राबाहेर आहे. तो सध्या आमच्यासोबत दिल्लीत नाही, मात्र त्याची प्रकृती हळूहळू सुधारत आहे. तो केव्हा खेळायला तयार होईल हे त्यालाच उत्तम माहीत आहे. धोनी नेट्समध्ये फलंदाजीचा सराव करत असल्याची माहितीही समोर आली आहे. दरम्यान, या हंगामात सीएसकेची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. संघाने आतापर्यंत ९ सामन्यांमध्ये ४ विजय मिळवले असून, ते सध्या प्लेऑफ शर्यतीत आव्हानात्मक स्थितीत आहेत. उर्वरित पाच सामने संघासाठी ङ्गकरा किंवा मराफ स्वरूपाचे मानले जात आहेत. गोलंदाजी प्रशिक्षक सिमन्स यांनी युवा गोलंदाज अंशुल कंबोजचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, कंबोजने गेल्या हंगामापासूनच आपल्या कामगिरीत सातत्य ठेवले असून, यंदा त्याने १७ बळी घेत सर्वाधिक बळी घेणार्या गोलंदाजांमध्ये स्थान मिळवले आहे. त्याच्या गोलंदाजीतील कोन, यॉर्करची अचूकता आणि

## हिटमॅनच्या खेळीचे लखनौच्या प्रशिक्षकांकडून कौतुक!

मुंबई –वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात मुंबईचा हिटमॅन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहित शर्माचा हिट शो पाहायला मिळाला. स्पर्धेतील ४७ वा सामना मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी दोन्ही संघांसाठी अतिशय महत्वाचा होता. त्यामुळे विजय मिळवणं हाच एक पर्याय होता. पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या लखनौ सुपर जायंट्सने २० षटकांअखेर २२८ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना मुंबईने ६ गडी राखून विजय मिळवला. मुंबईकडून रोहित शर्माने सर्वाधिक ८४, तर रायन रिकल्टनने ८३ धावांची खेळी केली. या खेळीनंतर लखनौ सुपर जायंट्स संघाचे प्रशिक्षक जस्टीन लँगर यांनी रोहित शर्माच्या खेळीचं तोंडभरुन कौतुक केलं आहे.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात रोहित शर्माला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती. त्यामुळे त्याला संघाबाहेर व्हावं लागलं होतं. गेल्या काही सामन्यांमध्ये तो खेळू शकला नव्हता. पण लखनौ सुपर जायंट्स संघाविरुद्धच्या सामन्यात तो फिट होऊन संघात परतला. जेव्हा संघाला सर्वात जास्त गरज होती, त्यावेळी त्याने दमदार अर्धशतकी खेळी केली.
रोहित- रिकल्टन या जोडीने मिळून पहिल्या विकेटसाठी १४३

## रोहित आधीच फिट होता, तरी त्याला खेळवलं नाही... मुंबईच्या कोचने सस्पेन्स वाढवला!

मुंबई–मुंबई इंडियन्सचा दिग्गज बॅटर रोहित शर्माने सोमवारी लखनऊविरुद्धच्या सामन्यात दुखापतीनंतर धमाकेदार पुनरागमन केलं. रोहितने ८४ रनची आक्रमक खेळी केली, ज्यामुळे मुंबईने २२९ रनचं आव्हान सहज पार करून मोसमातला तिसरा विजय मिळवला. रोहित शर्माला १२ एप्रिलला आरसीबीविरुद्धच्या सामन्यात हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती, त्यानंतर रोहित ५ सामने खेळला नव्हता.
रोहित शर्माच्या गैरहजेरीमध्ये मुंबई इंडियन्सने ५ पैकी ४ मॅच गमावल्या, पण जेव्हा रोहितचं टीममध्ये कमबॅक झालं तेव्हा मुंबई पुन्हा एकदा विजयाच्या मार्गावर आली. २२ दिवसांनंतर रोहित शर्मा मॅच खेळला, पण त्याला आधीच मैदानात उतरायचं होतं, असं मुंबईचा हेड कोच महेला जयवर्धने म्हणाला आहे.रोहित शर्माला त्याच्या धडाकेबाज खेळीबद्दल मुंबईच्या ड्रेसिंग रूममध्ये मॅव्हरिक अवॉर्ड दिला गेला. पुरस्कार मिळाल्यानंतर रोहित प्रतिक्रिया देणारच होता, तेवढ्यात महेला जयवर्धने समोर आला आणि त्याने रोहितच्या कामगिरीचं विशेष कौतुक केलं. 'रोहितच्या बोलण्याआधी मला काहीतरी सांगायचं आहे, त्याचा प्रयत्न शानदार होता. त्याने इथपर्यंत पोहोचण्यासाठी खूप मेहनत घेतली. रोहित खेळण्यासाठी उत्सुक होता, पण यावेळी आम्ही ओल्ड मॅनसोबत धैर्य ठेवलं. तो एका आठवड्यात कमबॅक करू शकला असता, पण आम्ही त्याला आणखी एक आठवडा जास्तचा दिला, कारण तो पूर्णपणे तयार व्हायला पाहिजे', असं महेला जयवर्धने म्हणाला.रोहित शर्माने यंदाच्या आयपीएलमध्ये ५ सामने खेळले आहेत, ज्यात त्याने ५५.२५ च्या सरासरीने २२१ रन केल्या आहेत. रोहितच्या बॅटमधून २




## उत्तेजक चाचणी चुकल्याबद्दल कुस्तीपटू विनेशला नोटीस

नवी दिल्लीः विनेश नोंदणीकृत खेळाडू असल्याने तिला दररोज एक तास चाचणीसाठी उपलब्ध राहणे बंधनकारक होते, परंतु १८ डिसेंबर रोजी ती चाचणी पथकाला भेटली नाही.
अनुभवी भारतीय कुस्तीपटू विनेश फोगटला आंतरराष्ट्रीय चाचणी संस्थेने (खढअ) ठावठिकाणा नियमांचे पालन न केल्यामुळे नोटीस बजावली आहे.
नवी दिल्ली : अनुभवी कुस्तीपटू विनेश फोगटला स्पर्धाविरहित काळात उत्तेजक चाचणी चुकल्याबद्दल आंतरराष्ट्रीय चाचणी संस्थेने (आयटीए) नोटीस बजावली आहे. आपल्या ठावठिकाणाबाबत माहिती देण्यात विनेशला अपयश आले असून, गेल्या १२ महिन्यांतील विनेशची ही पहिलीच चूक ठरली आहे.
ही नोटीस म्हणजे उत्तेजक विरोधी नियमांचे उल्लंघन नसून,



ठावठिकाणा कलमांतर्गत दिलेला एक इशारा आहे. खेळाडू अचानक केल्या जार्णाया चाचणीसाठी नेहमी उपलब्ध राहावेत, या हेतूने हे नियम बनवण्यात आले आहेत. संयुक्त कुस्ती महासंघ (यूडब्ल्यूडब्ल्यू) आणि जागतिक उत्तेजक प्रतिबंध संस्था (वाडा) यांच्या नियमांनुसार, एका वर्षात तीन वेळा चाचणी चुकवणे किंवा ठावठिकाणा कळवण्यात अपयशी ठरल्यास, ते उत्तेजक सेवन विरोधातील नियमांचे उल्लंघन मानले जाते आणि त्यासाठी दोन वर्षांपर्यंतच्या निलंबनाची तरतूद असू शकते.विनेशकडून ही चूक निष्काळजीपणामुळे झालेली नाही. त्यामुळे याची चुकलेली चाचणी म्हणून नोंद केली जाईल, असे विनेशला पाठवलेल्या नोटिशीत म्हटले आहे. ही चूक निष्काळजीपणे झाल्याचे विनेशने सात दिवसांत सिद्ध करावे अन्यथा ही कारवाई अंतिम राहील, असेही पुढे म्हणण्यात आले आहे.
अधिवेशनासाठी उपस्थितीचे कारण गेल्या वर्षी १८ डिसेंबरला नियमानुसार ६० मिनिटांच्या कालावधीत विनेश चाचणीसाठी उपलब्ध होऊ शकली नाही. विनेशचा चाचणीसाठी नोंदणी केलेल्या खेळाडूंमध्ये समावेश आहे. अशा नोंदणीकृत खेळाडूंना सकाळी ६ ते रात्री ११ या दरम्यानचा एक तासाचा असा वेळ निश्चित करावा लागतो, ज्यामध्ये ते विनासूचना चाचणीसाठी उपलब्ध असावे लागतात. या संदर्भात विनेशकडून स्पष्टीकरण मागावण्यात आले होते. तेव्हा विनेशने हरियाणा विधानसभेच्या अधिवेशनासाठी उपस्थित असल्याचे सांगितले होते.

## हार्दिक आरसीबी विरुद्धच्या सामन्यात खेळणार का? नाही

मुंबई–आयपीएल २०२६ स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघाला नावाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. ५ वेळचा चॅम्पियन मुंबई इंडियन्सचा संघ यावेळी विजय मिळवण्यासाठी संघर्ष करताना दिसून येत आहे. हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या मुंबई इंडियन्सने आतापर्यंत १० पैकी केवळ ३ सामने जिंकले आहेत. तर ७ सामन्यांमध्ये मुंबईला पराभवाचा सामना करावा लागला आहे. लखनौविरूद्ध झालेल्या सामन्यात मुंबईने दमदार विजय मिळवला. पण इथून पुढे प्रत्येक सामना हा मुंबई इंडियन्ससाठी मकरो वा मरोफ सामना असणार आहे. लखनौविरूद्ध झालेल्या सामन्यात हार्दिक पंड्या दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. आता त्याच्या दुखापतीबाबत मोठी अपडेट समोर आली आहे गुणतालिकेत तळाशी असलेल्या मुंबई इंडियन्ससाठी इथून पुढे सर्व सामने नॉकआऊट सामने असणार आहे. एकही सामना गमावला, तर मुंबईचा संघ स्पर्धेतून बाहेर पडू शकतो. त्यामुळे मुंबईला आणखी जोर लावावा लागणार आहे. लखनौविरूद्ध झालेला सामना देखील मुंबई इंडियन्ससाठी अतिशय महत्वाचा होता. या महत्वाच्या सामन्यात मुंबईने दमदार कामगिरी केली आणि ६ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात हार्दिक पंड्या दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. त्यामुळे त्याच्या जागी सूर्यकुमार यादव संघाचं नेतृत्व करताना दिसून आला होता.हार्दिक पंड्या पाठीच्या दुखण्यामुळे या सामन्यात खेळू शकला नव्हता. मुंबई इंडियन्सच्या विजयानंतर, रायन रिकल्टनने पत्रकार परिषदेत बोलताना हार्दिकच्या फिटनेसबाबत अपडेट दिली आहे.

# मुरूड ग्रामपंचायतीचे नगर परिषदेत रूपांतर व्हावे; काँग्रेसचा पुढाकार, स्वाक्षरी मोहिमेला प्रारंभ

## धिरज देशमुख यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न



**मुरूड/प्रतिनिधी :** मुरूडकरांची अनेक वर्षांची मागणी आणि शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन मुरूड ग्रामपंचायतीचे रूपांतर नगर परिषदेत व्हावे, या दृष्टीने सकारात्मक पावले उचलण्यासाठी काँग्रेस पक्षाने पुढाकार घेत नागरिकांच्या भावना व अपेक्षा शासनापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार केला आहे.

याच अनुषंगाने मुरूड येथे लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत सुसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.


या बैठकीत मुरूडमधील नागरिक, कृती समिती, किराणा व्यापारी असोसिएशन, विश्वकर्मा संघटना, कापड दुकानदार, डॉक्टर, इंजिनीअर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली मते व सूचना मांडल्या. बैठकीदरम्यान धिरज विलासराव देशमुख यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेत सकारात्मक संवाद साधला.

मुरूडच्या सर्वांगीण विकासासाठी नगर परिषद होणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून युवक काँग्रेसच्या वतीने मुरूड नगर परिषद व्हावी या मागणीसाठी स्वाक्षरी मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेतील पहिली स्वाक्षरी धिरज विलासराव देशमुख यांनी करून अभियानाची सुरुवात केली.

मुरूडकरांच्या विकासासाठी, हक्कासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी आम्ही कायम त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे आहोत, असा विश्वास धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी नागरिकांना दिला.यावेळी पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले,उपसभापती महेश चव्हाण,डॉ हणुमंतदास चांडक, नितीन सुराणा, दत्ता पुदाले, कॅप्टन चव्हाण, शिवलिंग चौधरी, बळवंत पांचाळ यांच्या सह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरच्या जयंतीतून खंडाळीत उभा राहिला ज्ञानाचा दीप

## डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या प्रेरणादायी भाषणानंतर अवघ्या अर्ध्या तासात गावात वाचनालयासाठी ७५ हजारांची उभारणी



**अहमदपूर/प्रतिनिधी :**

तालूक्यातील खंडाळी गावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या व्याख्यान कार्यक्रमा नंतर एक अनुकरणीय बाब ओघाने घडून गेली.प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात पुस्तकाचे महत्व विषद करताच कार्यक्रमानंतर लागलीच अवघ्या अर्ध्या तासातच अगदी उस्फूर्तपणे ७५ हजार रूपयांची वर्गणी पुस्तकांसाठी जमा झाली.

त्याचे झाले असे की,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून युवकनेते डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांना बोलावण्यात आले होते.त्यांनी आपल्या प्रभावी आणि विचारप्रवर्तक भाषणातून वाचन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांमध्ये एक नवा जागर निर्माण केला. शिक्षण हेच विकासाचे प्रभावी माध्यम असून पुस्तकाशिवाय जीवनात परिवर्तन होणार नसल्याचे सांगीतले.तसेच टीव्ही,मोबाईल याच्या अतिरेकी वापरामूळे आपण वाचनापासून दूर जात असल्याचे सांगीतले. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे अवाहन केले.

आपल्या भाषणात त्यांनी पुस्तकप्रेमी बाबासाहेब या पैलूवर प्रकाश टाकत अनेक प्रेरणादायी दाखले दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण जीवनच ज्ञान, अभ्यास आणि वाचन याभोवती फिरत होते, हे त्यांनी ठळकपणे मांडले.

मात्र, आजच्या काळात युवकांमध्ये वाचनाकडे झुकाव कमी होत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. युवकांना आणि समाजाला प्रगतीच्या दिशेने नेणारे एकमेव प्रभावी माध्यम म्हणजे शिक्षण, असे सांगताना त्यांनी एक अत्यंत साधा पण परिणामकारक उपाय सुचवला. 'प्रत्येक गावात जयंतीच्या निमित्ताने खर्चात बचत करून एक पुस्तक कपाट आणि पुस्तके घेऊन ते समाजमंदिरात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावेत.

या उपक्रमातून अनेक विद्यार्थी आणि युवक घडतील, आणि त्यातूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे खरे सार्थक होईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

प्रेरणेचा परिणाम:-शब्दातून कृतीकडे

डॉ.सूर्यवंशी यांच्या भाषणाचा प्रभाव इतका तीव्र होता की, भाषण संपताच उपस्थित ग्रामस्थ, युवक आणि ज्येष्ठ मंडळी एकत्र आले आणि लगेचच वाचनालयासाठी निधी संकलनाची सुरुवात झाली.

या उपक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापकांनी २हजार रूपये देऊन केली. त्यानंतर जयंती मंडळाचे अध्यक्ष शरद सोनकांबळे यांनी ५ हजार रूपये ,सामाजिक कार्यकर्ते सुभाषराव सोनकांबळे यांनी २हजार रूपये,कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशांत शिंदे यांनी २१ हजार रूपये, जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी प्रदिप खोमणे ५ हजार रूपये तसेच व्यावसायिक मोरे यांनी पुस्तक व कपाटासाठी तब्बल ४१हजार रूपये,पोलिस पाटील यांनी ११ हजार रूपये अशा उत्स्फूर्त प्रतिसादातून अवघ्या अर्ध्या तासात ७५ हजार इतका निधी जमा झाला.

**ज्ञानाचा दीप प्रज्वलित झाला..!**

या घटनेबद्दल बोलताना डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी सांगितले की,हा केवळ निधी संकलनाचा उपक्रम नाही, तर गावात वाचन संस्कृतीचा पाया घालणारी ऐतिहासिक सुरुवात आहे.

त्यांनी जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना विश्वास व्यक्त केला की, या उपक्रमामुळे गावात निश्चितपणे वाचनाची गोडी वाढेल आणि येणाऱ्या पिढ्यांना याचा मोठा लाभ होईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने केवळ औपचारिक कार्यक्रम न करता, ज्ञान आणि वाचनाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची दिशा देणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे.

जयंती साजरी करण्यापेक्षा विचार जपणे महत्त्वाचे, हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला असून, गावागावात अशा वाचनालयांच्या चळवळी उभ्या राहाव्यात, हीच अपेक्षा व्यक्त केली आहे.

# उन्हाचा पारा वाढता, आपल्या जनावरांचे आरोग्य सांभाळा

**उदगीर/प्रतिनिधी :** सध्या राज्यात उष्णतेची लाट तीव्र होत असून तिचा विपरीत परिणाम केवळ मानवी आरोग्यावर नव्हे, तर जनावरांच्या आरोग्यावरही मोठ्या प्रमाणात होत आहे. गाई-म्हशींमध्येही उष्णतेचा ताण (हीट स्ट्रेस) झपाट्याने वाढत असल्याचे दिसून येत आहे. याचा थेट परिणाम जनावरांच्या आरोग्य, दूध उत्पादन आणि प्रजननक्षमतेवर होत असल्याने पशुपालकांनी उन्हाळ्यात जनावरांच्या व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन ज्येष्ठ पशुतज्ज्ञ तथा माफसूचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने यांनी केले आहे.

म्हशींना उष्णतेचा सर्वाधिक त्रास होतो. काळी कातडी आणि कमी घामग्रंथी असल्यामुळे म्हशींना गाईंपेक्षा उष्णता सहन करणे अधिक कठीण जाते. त्याचप्रमाणे संकरित गाईंच्या त्वचेतही घामग्रंथी कमी असल्याने त्या देखील उष्णतेच्या ताणास लवकर बळी पडतात. उष्णतेच्या ताणामुळे जनावरांच्या वर्तनात आणि आरोग्यात स्पष्ट बदल दिसून येतात. जनावरे चारा कमी खातात, पाणी अधिक पितात, धापा टाकतात, तोंडातून लाळ गळते, सुस्त होतात आणि दूध उत्पादनात घट दिसून येते. काही वेळा दुभत्या जनावरांचे दूध प्रतिदिन एक ते दोन लिटरपर्यंत कमी होते.काही जनावरांत अपचन होते बद्धकोष्टता होते किंवा हगवण लागते. उष्णतेचा परिणाम प्रजननक्षमतेवरही गंभीरपणे होतो. माज न येणे, मुका माज येणे, गर्भधारणेचे प्रमाण घटणे आणि पुनरावृत्ती माज वाढणे अशा समस्या निर्माण होतात.

या दुष्परिणामांपासून जनावरांचे संरक्षण करण्यासाठी काही सोप्या पण अत्यंत प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. जनावरांना थेट उन्हात बांधू नये. सकाळी १० ते सांयकाळी ५ मोकळे सोडू नये . गोठ्यात पुरेशी सावली, खेळती हवा आणि उष्णता कमी शोषणारे छत असावे. पत्र्याच्या छतावर गवत, गोणपाट किंवा शेडनेट टाकल्यास उष्णता कमी होते. जनावरांना दिवसभर मुबलक स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. पाण्यात बर्फ टाकल्यास जनावरे पाणी अधिक आवडीने पितात. पाण्याचा हौद सावलीत ठेवावा. शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी दुपारच्या वेळी गाईम्हशीवर दोन तिन वेळा पाण्याचा शिडकावा करावा. गोठ्यात फॉगर्स व्यवस्था केल्यास उष्णतेचा ताण लक्षणीयरीत्या कमी करता येतो.

# महात्मा बसवेश्वरच्या शिरपेचात मानाचा तुरा ०४ एनसीसी कॅडेट्सची पोलीस दलात भरती



**लातूर/प्रतिनिधी:** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभाग (एनसीसी) विभागाने आपल्या यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाच्या एस.यु.ओ. श्रीखंड घायाळ (अहिल्यानगर पोलीस), कॅडेट कृष्णा हाके (भंडारा पोलीस), कॅडेट आनंद तोंडारे (पुणे पोलीस) आणि कॅडेट पायल सूर्यवंशी (पालघर पोलीस) अश्या ०४ कॅडेट्सची महाराष्ट्र पोलीस दलात विविध जिल्ह्यांमध्ये निवड झाली आहे.

या दैदीप्यमान यशाबद्दल १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये नवनियुक्त पोलीस जवानांचा महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे आणि सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य (कनिष्ठ) प्रा.नितीन वाणी, एनसीसी प्रमुख लेफ्टनंट डॉ.सुजित हांडीबाग, कला शाखा समन्वयक डॉ.सदाशिव दंदे, वाणिज्य शाखा समन्वयक प्रो.डॉ.विजयकुमार सोनी, विज्ञान शाखा समन्वयक प्रो.डॉ.दीपक चाटे आणि समाजकार्य शाखा समन्वयक प्रो.डॉ. दिनेश मौने यांची उपस्थिती होती.

या चारही कॅडेट्सनी आपल्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या जोरावर पोलीस भरतीत यश मिळवून खाकी वर्दी परिधान करण्याचे स्वप्न पूर्ण करून जिल्ह्यांच्या पोलीस दलात स्थान मिळवले आहे.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी कॅडेट्सशी संवाद साधला असता, एनसीसीच्या प्रशिक्षणामुळे लाभलेले 'सी' प्रमाणपत्र आणि तिथे मिळालेली शिस्त यामुळे पोलीस भरतीच्या प्रक्रियेत आम्हाला खूप मोठा फायदा झाला, अशा भावना व्यक्त केल्या.

एनसीसी विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक सक्षमीकरण होते याचे जिवंत उदाहरण म्हणजे या चार कॅडेट्सची झालेली निवड आहे असे मत यावेळी लेफ्टनंट डॉ. सुजित हांडीबाग यांनी व्यक्त केले.

त्यांनी मिळवेलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, इतर सर्व संचालक मंडळातील पदाधिकारी, कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय अभ्यासक्रम शाखा समन्वयक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज चौकात केलेल्या वाहतूक बदलाची डोकेदुखी: चालक त्रस्त, वाहतूक कोंडी सोडवण्यासाठीची उपायाने अडचणीत पडली भर



**लातूर/प्रतिनिधी :** मागील काही वर्षांपासून लातूर शहरात वाढत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे वाहनधारकांबरोबच लातूरकर नागरिक त्रस्त झाले आहेत. शहरातील मेन रोड, बार्शी रोड, अंबाजोगाई रोड आणि औसा रोड या शहरातून चार दिशेला जाणाऱ्या प्रमुख मार्गावर वाहतूक कोंडीचा फास आवळत जात आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी महानगरपालिका, पोलिस प्रशासनाच्यावतीने वाहतूक मार्गात बदल केले आहेत. परंतु, वाहतूक सुरळीत होण्याऐवेजी त्यात आणखीनचं भर पडत आहे. यामध्ये शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या आणि प्रमुख चारही रस्ते एकत्र येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात वळण रस्त्यामध्ये बदल केल्यामुळे चौकाच्या चारही भागात वाहनांच्या लांब रांगा लागत असल्यामुळे वाहनधारक बुचकुळ्यात पडले आहेत.

शहरांतर्गत वाहनाची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.लातूर शहरातील आणि इतर ठिकाणहून येणाऱ्या दुचाकी, चारचाकी, मालवाहू आणि एस.टी.बसेस आणि खासगी प्रवासी वाहनांची संख्या ही लाखांमध्ये आहे. त्यामुळे सातत्याने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाच नंबर चौक, आंबोजोगाई रोडवरील जुना आणि नवीन रेणापूर नाका, औसा रोडवर नंदी स्टॉप ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान सकाळी १०.०० ते सायंकाळी ९.३० ते १०.०० वाजेपर्यंत वारंवार वाहतूक कोंडी होते. दरम्यान, वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणी वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी काही दिवसांपूर्वी महानगरपालिका प्रशासन, पोलिस प्रशासनाने भेट घेत पाहणी करून आवश्यक बदल करण्यासंदर्भात निर्णय घेतले होते. याच पार्श्वभूमिवर रविवारपासून नवीन वाहतूक मार्ग केले. यामध्ये महात्मा गांधी चौक, मिनी मार्केट चौक, अशोक हॉटेल चौक येथुन जाणाऱ्या सर्व वाहनांना (दुचाकी वगळून) भुयारी मार्गालगतचा रोड छ. शिवाजी महाराज चौक. वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. त्यामुळे वाहनधारकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन वाहनांच्या रांगा या लागत आहेत.

# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

**शिराढोण/प्रतिनिधी:** पोलीस ठाणेअंतर्गत समीर रा.शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव, प्रदीप श्रीहरी शिंदे, वय ४६ वर्षे, रा. कोथळी ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०४.०५.२०२६ रोजी १२.३० ते १२.४० वा. सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे छोटा हत्ती क्र एमएच १२ एफडी ०५८९ व टॅक्टर क्र एमएच २५ एच १८६१ ही वाहने शिराढोण ते जायफळ जाणारे रोडवर व शिराढोण टी. पॉईंट जाणारे रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना शिराढोण पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये शिराढोण पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.



## पशुपालकांसाठी सुवर्णसंधी ; केसीसीअंतर्गत ३ लाखांपर्यंत कर्ज,व्याज सवलतीमुळे शून्य टक्क्यांचा लाभ शक्य

धाराशिव (जिमाका)- राज्यातील पशुपालन,शेळी- मेंढीपालन,कुक्कुटपालन आणि वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड (KCC)' मोहीम राबविण्यात येत आहे.या योजनेंतर्गत पशुपालकांना त्यांच्या पशुधनाच्या देखभालीसाठी व दैनंदिन खर्चासाठी (खेळते भांडवल) आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेंतर्गत ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही,त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण उपलब्ध करून दिले जाणार आहे.दूध संस्थेने हमी दिल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. तसेच,ज्यांच्याकडे आधीच किसान क्रेडिट कार्ड आहे,त्यांनाही ३ लाखांपर्यंतची पतमर्यादा वाढवून घेता येईल. कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून ३ टक्के आणि राज्य शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार ४ टक्के अशी एकूण ७ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत मिळू शकते.बँकांनाही यात २ टक्के व्याज सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालक व शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत शून्य टक्के व्याजदराचाही लाभ घेता येण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

सन २०२६-२७ पासून मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना (राज्य व जिल्हास्तर) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना या क्रेडिट कार्डद्वारे खेळते भांडवलाचा लाभ घेता येणार आहे. राज्यातील १० लाख पात्र पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट पशुसंवर्धन विभागाने ठेवले आहे.अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयात अथवा १९६२ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जे पशुपालक दूध सोसायटी,दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद आहेत व ज्यांनी अद्याप या योजनेचा लाभ घेतलेला नाही,असे सर्व शेतकरी या मोहिमेसाठी पात्र आहेत.'पशुसंवर्धन उपआयुक्त' हे या योजनेचे सनियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत असून,सध्या पशुपालन करणाऱ्या व या योजनेपासून वंचित राहिलेल्या पात्र पशुपालकांना लाभ घेण्याची संधी उपलब्ध आहे.

पात्रता : प्रकल्प धारकाने केंद्र/राज्य शासन/जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा. पशुपालन प्रकल्पांमधील सर्व पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.

**व्याज परतावा सवलत पुढीलप्रमाणे. कमाल पशुधन संख्या असलेल्या पशुपालकांनाच अनुज्ञेय राहील:**

२५,००० मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी.४५,००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट.१०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा. ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी/शेळी गोठा.२०० किंवा त्यापेक्षा कमी वराह. पशुपालकांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत करणे आवश्यक राहील. योजनेच्या निकषांनुसार तसेच वेळोवेळी होणाऱ्या बदलांनुसार आवश्यक बाबींची पूर्तता करणे लाभार्थ्यांस बंधनकारक राहील.या उपक्रमामुळे पशुपालकांना आर्थिक स्थैर्य मिळण्यासोबतच ग्रामीण भागातील पशुधन व्यवसायाला चालना मिळणार आहे.

## अन्यायाविरुद्ध राष्ट्रवादी महिला काँग्रेसचा एल्गार : आत्मदहन प्रकरणी गुन्हा दाखल करा, चिमुरडी अत्याचार प्रकरणी फाशीची मागणी




धाराशिव (शेख अंजुम)- धाराशिव येथे राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने दोन संतापजनक घटनांवर ठोस कारवाईची मागणी करत जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले. बेबी पाटील आत्मदहन प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा तसेच नसरापूर (ता. भोर) येथील चिमुरडीवरील अत्याचार व खून प्रकरणातील आरोपीला फास्ट ट्रॅक न्यायालयातून त्वरित फाशीची शिक्षा द्यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, एक मे रोजी महाराष्ट्र दिनाच्या दिवशी बेबी पाटील यांनी आपल्या अन्यायाविरोधात प्रशासनाला पत्राद्वारे पूर्वसूचना दिली होती. मात्र, प्रशासनाने याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले. आनंदनगर पोलीस ठाण्याकडून कोणतेही समुपदेशन करण्यात आले नाही, तसेच दुय्यम निबंधक व संबंधित अधिकाऱ्यांनीही मागणीचा विचार केला नाही. परिणामी, त्यांनी आत्मदहनाचा टोकाचा निर्णय घेतला असून त्या सध्या मृत्यूशी झुंज देत आहेत. त्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करावा, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेसकडून करण्यात आली.

तसेच भोर तालुक्यातील नसरापूर येथे चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या नराधमाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करत, हे प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून कठोरात कठोर शिक्षा फाशी देण्यात यावी, अशी मागणीही राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या मागण्यांची तात्काळ दखल न घेतल्यास २० मे रोजी राष्ट्रीय महामार्गावर किंवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदन देण्यापूर्वी महिलांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून पायी मोर्चा काढला. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देण्यात आले तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही निवेदन देण्यात आले.

या वेळी सरकारविरोधी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

या निवेदनावर राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष मनीषा पाटील, शहराध्यक्षा सरोजा जाधव, मंजुषा खळदकर, भक्ती राखुंडे, संगिता सलगर, मनीषा काशीद, आशा राखुंडे, श्यामल जाधव, अमृता जाधव, साधना शिंगाडे, सरस्वती कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत


**मध्य रेल्वे**

**सोलापुर मंडल**

**सिग्नलिंग कार्य**

**निविदा सूचना क्र.** ११-२०२६-SrDENCo. **कामाचे नाव:** अभियांत्रिकी विभागाच्या गँग हट्ससाठी (परिशिष्ट-III नुसार विविध ठिकाणी) एकूण ६८ नग मरिव्हर्स ऑस्मोसिसफ (R.O.) जलशुद्धीकरण यंत्रे पुरवणे, बसवणे, त्यांची उभारणी व कार्यान्वयन करणे; तसेच एक वर्षाच्या वॉरंटी कालावधीनंतर पुढील ३ वर्षांसाठी वार्षिक देखभाल करार AMC पुरवणे. **कामाचा अंदाजित खर्च:** २४,५५,३४४.००. **अनामत रक्कम:** ४९,१००.००. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ४८ महिने. **देखभाल कालावधी:** ०६ महिने. **निविदा सूचना क्र.** ०६-२०२६-SrDENC. **कामाचे नाव:** सोलापूर विभागामध्ये, लेव्हल क्रॉसिंग्जच्या (LCs) जागी उभारलेल्या 'RUBs' साचलेले पाणी उपसून बाहेर काढणे आणि पावसाळ्याच्या काळात सर्व RUBs मधील गाळ व कचरा साफ करणे कालावधी: १ वर्ष. **कामाचा अंदाजित खर्च:** ८७,७५,६२४.७६. **अनामत रक्कम:** १,७५,५००.००. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **देखभाल कालावधी:** निरंक. **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख व वेळ: **11-2026-SrDENCO** - २२.०५.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **06-2026-SrDENC** - २०.०५.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर निविदा उघडण्याची तारीख व वेळ: **09-2026-SrDENCo** - २२.०५.२०२६ रोजी १५.३० वाजता. **06-2026-SrDENC** - २०.०५.२०२६ रोजी १५.३० वाजता. इच्छुक निविदाकारांना असा सल्ला देण्यात येतो की, निविदा बंद होण्याच्या अंतिम तारखेपूर्वी, निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी त्यांनी या संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in**

**मं.रे.प्र.(नि.), सोलापुर**

रेल्वे क्रॉसिंग बंद असताना ते ओलांडण्यास मनाई आहे. 16


## प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात संपन्न



मुरूम,(प्रतिनिधी) – नगर शिक्षण विकास मंडळ संचलित श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. सुधीर पंचगल्ले यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा शुक्रवार (ता. १) रोजी अत्यंत भावपूर्ण आणि उत्साही वातावरणात पार पडला. प्रदीर्घ शैक्षणिक योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी राज्यमंत्री तथा भाजपा लातूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील म्हणाले की, प्राध्यापक हा केवळ तासिका घेणारा कर्मचारी नसून तो पिढ्या घडवणारा खरा शिल्पकार असतो. डॉ. पंचगल्ले यांनी आपल्या सेवाकाळात पुस्तकी ज्ञानासोबतच हजारो विद्यार्थ्यांना जगण्याची दिशा दिली. निवृत्ती ही केवळ सेवापुस्तकातील असते, कर्तव्यातील नसते. कर्तव्यातून निवृत्ती कधीच नसते. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग समाजाला यापुढेही होत राहील याची खात्री आहे. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, सहाय्यक शिक्षण संचालक संजय पंचगल्ले, सत्यसाई पब्लिक स्कूलचे (भालकी) अध्यक्ष चंद्रशेखर यम्मे, प्रादेशिक व्यवस्थापक शिवाजी शिंदे (पानिपत), धनराज मंगरुळे, डॉ. सतीश शेळके, सूर्यकांत जाधव, गणेश अंबर, उल्हास घुरघुरे यांची उपस्थिती होती.

बसवराज पाटील व बापूराव पाटील यांच्या हस्ते डॉ. सुधीर पंचगल्ले व त्यांच्या सुविद्य पत्नी विजयाताई यांचा शाल, सन्मानचिन्ह, बुके आणि मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला. आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ. पंचगल्ले भावूक झाले होते. या महाविद्यालयाने मला ओळख दिली आणि इथल्या विद्यार्थ्यांनी मला सदैव कार्य करण्याची ऊर्जा दिली, अशा शब्दांत त्यांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी संजय पंचगल्ले, प्रा. विजया बेलकेरी, डॉ. राम बजगिरे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक हाळे, संजय गोणगे, अशोक बेलकेरी, मनोज पंचगल्ले, अरुण राजेश्वरे, अनिकेत पंचगल्ले, शिवराज पंचगल्ले यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले यांनी तर आभार डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी केले. या सोहळ्याला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**

## धाराशिव मध्ये तब्बल ३ वर्षांनी निर्बीजीकरण सुरू; पहिल्याच दिवशी ३० श्वान पकडले



धाराशिव (प्रतिनिधी)-तब्बल तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर धाराशिवमध्ये भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शहरातील विविध भागांतील कुत्रे पकडण्यासाठी उत्तर प्रदेशातील सहा जणांची टीम कार्यरत करण्यात आली आहे. प्रत्येक भागात ही टीम कुत्र्यांचे रेस्क्यू करून सुरक्षितरीत्या निर्बीजीकरण करणार आहे. ही मोहीम सहा महिने सुरू राहणार असून पहिल्याच दिवशी ३० कुत्र्यांना विविध ठिकाणांहून पकडण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून धाराशिव शहरातील नागरिक कुत्र्यांच्या त्रासामुळे त्रस्त झाले होते. शहरात सर्वत्र भटक्या कुत्र्यांचा धुमाकूळ सुरू होता. कुत्र्यांच्या हल्ल्यात गेल्या चार महिन्यांमध्ये ७२ व्यक्ती जखमी झाल्या होत्या. यामध्ये लहान मुलांवरही कुत्र्यांनी हल्ले केले होते. यामुळे नगरपालिकेच्या कारभाराच्या विरोधात नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळत होती. सातत्याने कुत्र्यांच्या समस्येवर मात करण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात येत होती; मात्र नगरपालिकेकडून यावर ठोस उपाय करण्याकडे दुर्लक्ष होत होते. सातत्याने मागणी केल्यानंतर नगरपालिकेने आता कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यासाठी पावले उचलली आहेत.

शहरातील विविध भागात निर्बिजीकरण करण्यासाठी नगराध्यक्ष नेहा काकडे, उपाध्यक्ष अक्षय ढोबळे व मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या मार्गदर्शनात प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. पहिल्याच दिवशी ३० कुत्र्यांना विविध ठिकाणाहून पकडण्यात आले. नगरपालिकेने अन्य उपक्रमांप्रमाणे हा उपक्रम अर्ध्यात बंद पडू देऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, शहरातील सर्वच भागात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी निर्बिजीकरण मोहीम सहाय्यभूत ठरण्याची अपेक्षा आहे. ही मोहीम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शहरातील सर्व नगरपालिकेचे पदाधिकारी व नगरसेवकांनी सातत्याने पाठपुरावा करण्याची गरज आहे.

कुत्रे पकडण्यासाठी प्राणी संरक्षण कायद्यानुसार कठोर नियमावली आहे. या नियमावलीच्या अनुषंगाने कुत्र्यांचे रेस्क्यू करण्याची आवश्यकता असते. रेस्क्यू करत असताना कुत्र्यांना कोणतीही इजा होणार नाही, याची दक्षता घेतली जाते. यासाठी प्रशिक्षित असलेल्या सहा जणांची टीम कार्यरत आहे. यातील सदस्य उत्तर प्रदेशातील आहेत. कोल्हापूर येथील जेनिस स्मित निमल वेल्फेअर ट्रस्ट या कंपनीच्या वतीने ही मोहीम राबवण्यात येत आहे. कंपनीचे व्यवस्थापक अजय दहिभाते व पर्यवेक्षक सुमित देवकते यांच्या निगराणीखाली ही मोहिम राबवली जात आहे.

## भाजपच्या विजयाचा धाराशिवमध्ये जल्लोष; कार्यकर्त्यांकडून पेढे वाटप

धाराशिव पश्चिम बंगाल, पुदुच्चेरी आणि आसाम या राज्यांमध्ये भाजपने मिळवलेल्या विजयाचा आनंदोत्सव धाराशिव शहरात साजरा करण्यात आला. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी उपस्थितांना पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

पश्चिम बंगाल, पुदुच्चेरी आणि आसाम या राज्यांमध्ये भाजपला मिळालेले यश हे विकासाभिमुख धोरणांवरील जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले तसेच बारामती विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीत महायुतीच्या नेत्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सर्वच विक्रम मोडीत काढत २ लाख १८ हजार ९३० मतांच्या विक्रमी फरकाने विजय मिळवला आहे.

या निमित्ताने धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी चौकात भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे वाटून आनंद साजरा केला. यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हा प्रभारी डॉ. अर्चनाताई चाकूरकर, भाजपचे युवा नेते शरण पाटील, अनिल काळे, नेताजी पाटील, सतीश दंडनाईक, विक्रमसिंह देशमुख, प्रकाश आष्टे, संतोष बोबडे, प्रीती कदम, डॉ. सरोजिनी राऊत, विजय शिंगाडे, सिद्धेश्वर कोरे आदी उपस्थित होते.

## रोख रक्कम १,२५,००० सोन्याचे दागिने असा एकुण २,४३,००० किंमतीचा माल चोरुन नेला

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी -मन्नान हमीदखॉ पठाण, वय ३८ वर्षेद्व रा. काढी गल्ली ढोकी ता. जि. धाराशिव हे दि. ०४.०५.२०२६ रोजी रुमचा दरवाजा उघडा ठेवून झोपले असता अज्ञात व्यक्तीने घरातील रोख रक्कम १,२५,००० सोन्याचे दागिने असा एकुण २,४३,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मन्नान पठाण यांनी दि.०४.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो. ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649